रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २७३
www.ramprahar.com

रविवार, २१ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## हैदराबादची पॉवर प्लेमध्ये ऐतिहासिक धावसंख्या



**नवी दिल्ली :** सनरायझर्स हैदराबादविरूद्ध दिल्ली कॅपिटल्सचा सामना शनिवारी (दि.२०) अरूण जेटली स्टेडियमवर खेळवला गेला. या सामन्यात नाणेफेक गमावत हैदराबादचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. एका वेगळ्याच फॉर्मात असलेले हैदराबादचे सलामीवीर ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांनी ऐतिहासिक फलंदाजी केली आहे. अवघ्या २.४ षटकांत या दोघांनीही संघाची धावसंख्या ५० धावांच्या घरात नेली. या दोघांनीही पॉवर प्लेमध्ये म्हणजेच अवघ्या सहा षटकांमध्ये १२५ धावा केल्या आहेत. आयपीएल आणि टी-२०च्या इतिहासातील ही सर्वांत मोठी पॉवर प्लेमधील संख्या आहे.

# काँग्रेसने दिलेल्या प्रत्येक जखमेवर उपचार करू

## ▪ नांदेड, परभणी येथील सभेत पंतप्रधान मोदी यांचे आश्वासन



**नांदेड, परभणी : प्रतिनिधी**

गरिबीची कुचेष्टा आणि गरिबांची फसवणूक करणाऱ्या काँग्रेसने जनतेच्या क्षमतेवर विश्वास ठेवला नाही. त्यांच्या इंडी आघाडीतील पक्षांचा परस्परांवर विश्वास नाही, त्यामुळे आता जनतेनेही काँग्रेस व इंडी आघाडीवर विश्वास ठेवू नये. काँग्रेसने त्यांच्या सत्ताकाळात केलेल्या प्रत्येक जखमेवर आम्ही इलाज आणि उपचार करू, ही मोदींची गॅरेंटी आहे, आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोद यांनी केले.

महायुतीचे नांदेडचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर, हिंगोलीचे उमेदवार बाबुराव कदम कोहाळीकर आणि परभणीचे उमेदवार महादेव जानकर (रासप) यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.२०) सभेदरम्यान मराठवाड्यातील मतदारांशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी बोलत होते. नांदेड येथील सभेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामीण विकासमंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे आदी उपस्थित होते. परभणी येथील सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय समाज कल्याणमंत्री रामदास आठवले, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड आदी उपस्थित होते.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, आपला भ्रष्टाचार लपविण्यासाठी एकत्र आलेल्या इंडी आघाडीतील नेत्यांचा परस्परांवर विश्वास नाही आणि देशातील जनतेवरही विश्वास नाही. काँग्रेसचे नेते राहुल गांधी अमेठीमधून पराभूत झाल्यानंतर वायनाडमध्ये आले, पण तेथेही त्यांना पराभव चाखावा लागणार असून वायनाडमधील मतदान पार पडल्यानंतर पळ काढून दुसरा सुरक्षित मतदारसंघ शोधावा लागणार आहे, असे ते म्हणाले. ज्या परिवाराच्या भरवशावर काँग्रेस पक्ष चालतो, त्या परिवाराचा स्वतःवरच भरवसा राहिलेला नाही, अशी खोचक टीकाही त्यांनी केली. काँग्रेस अशी वेल आहे, ज्याचे स्वतःचे मूळ आणि जमीन नाही. या वेलीला जो आधार देतो, त्यालाच ती संपवते. त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाची फाळणी केली, काश्मिरचा प्रश्न पेटवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान जम्मू आणि काश्मिरमध्ये लागू होऊ दिले नाही. तिथल्या दलितांना इतके वर्ष अधिकारच मिळू दिले नाही. महाराष्ट्रातही काँग्रेसचे सरकार असताना मराठवाड्यातून निजामांचे राज्य केले आहे. निजामासारखीच मानसिकता ठेवून त्यांनी मराठवाड्याचा विकास होऊ दिला नाही, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.

मराठवाड्याच्या विकासाकरिता केंद्र व राज्य सरकारने केलेल्या कामांची यादीच पंतप्रधान मोदींनी जनतेसमोर सादर केली. गेल्या पाच वर्षांतील विकासकामे ही तर केवळ सुरुवात आहे, पुढच्या पाच वर्षांत विकासाची कामे अधिक गतिमान होतील, असेही पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. ३७०च्या जाचातून काश्मिरची मुक्तता, तिहेरी तलाक प्रथेतून मुस्लिम महिलांची मुक्तता, देशातील कोट्यवधी महिलांचे लखपती दीदीसारख्या योजनांतून सक्षमीकरण, युवकांना रोजगाराच्या संधी ही आमची कामगिरी आहे. म्हणूनच गेल्या दहा वर्षांत सुरू झालेल्या विकासयात्रेला बळ देण्यासाठी एनडीएच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन पंतप्रधानांनी केले.



> **आजपर्यंत आपण म्हणायचो, जगात जर्मनी आणि भारतात परभणी, पण पुढच्या पाच वर्षांत भारतच जर्मनीच्या पुढे जाणार आहे. काही लोक असेही म्हणतात की बनी तो बनी, नही तो परभणी. आता तसे चालणार नाही. बनी तो बनी, अभीही बनी और बनेगी तो परभणी!**
> **–देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**



## खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी पनवेलमध्ये जोरदार प्रचार

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारार्थ पनवेल परिसरात भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते आणि पदाधिकारी प्रचार करीत आहेत. त्यामुळे पनवेलमध्ये प्रचारात खासदार बारणे यांनी मुसंडी मारली आहे.

महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे पुन्हा खासदार व्हावे यासाठी पनवेल शहरात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रचार झाला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, निता माळी, रुचिता लोंढे, माजी नगरसेवक प्रदीप सावंत, डी. आर. भोईर, शिवसेनेचे पनवेल महाप्रमुख प्रथमेश सोमण, भाजपचे शहर सरचिटणीस अमित ओझे, संजय जैन, संजय भगत, केदार भगत, प्रीतम म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, चिन्मय समेळ, शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, रोहित जगताप, आरपीआयचे किशोर गायकवाड, गौतम पाटेकर, भाजपचे प्रभाग अध्यक्ष पवन सोनी, सुनील खळदे, सुहासिनी केकाणे, अंजली इनामदार, सपना पाटील, उपेंद्र मराठे, भरत जाधव, कोमल कोळी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संजय राऊतांच्या वक्तव्याकडे दुर्लक्ष करा –नाना पटोले



**मुंबई :** उद्धव ठाकरे हे इंडिया आघाडीत पंतप्रधान का असू शकत नाहीत याचा निर्णय इंडिया आघाडीत बसून घेतला जाईल. पंतप्रधानपदाची संधी उद्धव ठाकरे यांना मिळाली तर, शरद पवार पाठिंबा देतील, असे वक्तव्य संजय राऊत यांनी सांगलीमध्ये केले. राऊतांच्या या वक्तव्यानंतर आता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी त्यांच्यावर थेट निशाणा साधला आहे.

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, संजय राऊत रोज आपले वक्तव्य बदलतात. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याला फार महत्त्व देऊ नका. कालपर्यंत राहुल गांधींना पंतप्रधान बनवायला निघाले होते. आज आता त्यांन उद्धव ठाकरे दिसत आहेत. यामुळे त्यांच्या या पद्धतीच्या वक्तव्याकडे फार काही लक्ष देऊ नका आणि त्यांनीही अशा पद्धतीचे वक्तव्य करू नेये.

उद्धव ठाकरे हे इंडिया आघाडीत पंतप्रधान का असू शकत नाहीत, याचा निर्णय इंडिया आघाडीत बसून घेतला जाईल. उद्धव ठाकरे यांनी उत्तम काम केले आहे. आमच्याकडे जास्त चेहरे आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

## निवडक

### जागतिक वसुंधरा दिनी उल्का वर्षावाची पर्वणी

**अकोला :** आकाशात सूर्य विषुववृत्ताकडून कर्कवृत्ताकडे सरकताना तापमानाचे नवनवे उच्चांक गाठत आहे. रणरणत्या उन्हाचा ताप कमी करण्यासाठी रात्रीच्या वेळी ग्रह-तारे आपल्या सोबतीला येऊन काहीसा दिलासा देतात. अशाच प्रकारचा विविधरंगी प्रकाश उत्सव अर्थात उल्का वर्षाव २१ व २२ एप्रिल या जागतिक वसुंधरा दिनी होणार आहे. स्वरमंडळ तारका समुहातून होणार हा उल्का वर्षाव पूर्व आकाशात पाहता येणार आहे. रात्री ११ वा. नंतर पूर्व क्षितिजावर सुरू होऊन पहाटे आकाश मध्याशी असताना त्यांचा वेग वाढलेला असेल.

### मुंबई विमानतळावर पाच कोटी ७० लाखांचे सोने जप्त

**मुंबई :** १५ ते १८ एप्रिल या कालावधीमध्ये मुंबई विमानतळावरील सीमा शुल्क विभागाने नऊ किलो ४८२ ग्रॅम सोन्याच्या तस्करीचा पर्दाफाश केला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात या सोन्याची किंमत पाच कोटी ७० लाख रुपये इतकी आहे. एकूण १४ प्रकरणात ही कारवाई करण्यात आली असून एकूण आठ जणांना अटक करण्यात आली आहे. नैरोबी, अदिस अबाबा, पॅरिस येथून मुंबईत आलेल्या चार परदेशी प्रवाशांना या प्रकरणी अटक करण्यात आले आहे.

## एक खोटं बोलल्यामुळे शंभरदा खोटे बोलावे लागतेय

### मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांचा टोला

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे हे एक खोटं बोलल्यामुळे त्यांना आता शंभर वेळा खोटे बोलावे लागते आहे, असा टोला मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी लगावला.



आदित्य ठाकरे यांना मुख्यमंत्री करण्याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी शब्द दिला होता, अशा आशयाचे विधान उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले होते. त्यावर माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आमदार ॲड. आशिष शेलार म्हणाले की, गेले दोन-चार वर्षे उद्धवजी म्हणत होते की, मी आणि अमित शाह यांच्यात चर्चा झाली. अमित शाह यांनी मला मुख्यमंत्रीपदाबाबत शब्द दिला होता, असा दावा त्यांनी केला होता. आता त्यांनी दुसरा दावा केला आहे की, माझी आणि देवेंद्रजींची चर्चा झाली. वर्षानुवर्षे दावे ते बदलत आहेत.

तशी कोणतीही चर्चा झाली नाही हे ना. अमित शाह यांनी स्पष्ट केले. त्यामुळे उद्धव ठाकरे यांचे हे खोटे विधान ना जनतेला पटले, ना शिवसैनिकांना. त्यामुळे आता ते आणखी एक खोटे बोलत आहेत. माझी आई मला सांगत असे की, खोटे कधी बोलू नको, एक खोटं बोलले की, पुढे शंभरदा खोटे बोलावे लागते. उद्धव ठाकरे आपले एक खोटे पचवण्यासाठी आणखी एकदा खोटे बोलले आहेत. आणखी त्यांना कितीवेळा खोटे बोलावे लागणार आहे असा प्रश्न आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे केंद्रीय मंत्री अमितभाई शाह यांनी आपल्या मुलाखतीत सांगितले होते की, पुत्र प्रेमातून शिवसेना फुटली. आज याला पुष्टी मिळाली असून शिवसैनिकाला मुख्यमंत्रीपदी बसवायचे आहे असे उद्धव ठाकरे बोलत जरी असले तरी प्रत्यक्षात आदित्यलाच मुख्यमंत्री करायचे होते. त्यांच्या मनातील चांदणे आता समोर आले आहे, असेही आमदार ॲड. आशिष शेलार म्हणाले. विशेष म्हणजे ते जे वारंवार खोटे बोलत आहेत. त्याचे कुठलेही परिस्थितीजन्य पुरावे त्यांच्याकडे नाहीत, भाजपकडे असे अनेक पुरावे असून या मुद्द्यावर उद्धव ठाकरेच खोटे बोलत आहेत, हेच पुन्हा पुन्हा सिद्ध होते आहे, असेही आमदार ॲड. आशिष शेलार यांनी स्पष्ट केले.

## औरंगाबाद लोकसभेसाठी महायुतीकडून मंत्री संदीपान भुमरेंच्या नावावर शिक्कामोर्तब

**मुंबई : प्रतिनिधी**



गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीकडून उमेदवाराची अधिकृत घोषणा झाली आहे. त्यानुसार शिवसेनेच्या मंत्री संदीपान भुमरेंना लोकसभेच्या मैदानात उतरवले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत संदीपान भुमरेंच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले होते. आता अधिकृतपणे उमेदवारीची घोषणा झाली. संभाजीनगरमधून २०१९च्या निवडणुकीत औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून एमआयएमचे नेते इम्तियाज जलील निवडून आले होते. त्या वेळी एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडीची युती होती. या वेळी छत्रपती संभाजीनगरमध्ये व्हीबीएने काँग्रेसचे माजी नगरसेवक अफसर खान यांना उमेदवारी दिली आहे.

संदिपान भुमरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यामुळे आता छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेना व उबाठा गटामध्ये लढाई रंगणार आहे. छत्रपती संभाजीनगरच्या उमेदवारीबाबत एकनाथ शिंदे यांची एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीतच संदिपान भुमरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. या निर्णयानंतर आता संदिपान भुमरे यांनीदेखील तयारी सुरू केली आहे.

## ...तर देशात यूसीसी लागू करणार –केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



कोणत्याही लोकशाही देशात वैयक्तिक कायदे नसतात, असा युक्तिवाद करून केंद्रात सलग तिसऱ्यांदा विजय मिळविल्यास संपूर्ण देशात समान नागरी संहिता (यूसीसी) लागू करण्याच्या भाजपच्या वचनाचा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुनरुच्चार केला आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या विशेष मुलाखतीत ते बोलत होते.

ना. अमित शाह म्हणाले, देश शरियाच्या आधारावर चालवायला हवा का? वैयक्तिक कायद्याच्या आधारावर चालवायला हवा का? कोणत्याही देशात असे कायदे चालत नाहीत. जगातील कोणत्याही लोकशाही देशात वैयक्तिक कायदे नाहीत. मग भारतातच का? अनेक मुस्लिम देश शरिया कायद्याचे पालन करत नाहीत. काळ पुढे गेला आहे. आता भारतालाही पुढे जाण्याची गरज आहे, असेही ना. अमित शाह म्हणाले.

देशात समान नागरी संहिता लागू करणे हे भाजपने लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात दिलेले मुख्य आश्वासन आहे. अमित शाह म्हणाले की, सर्व लोकशाही देशांमध्ये समान नागरी कायदा आहे आणि भारतानेही ते करण्याची वेळ आली आहे. यूसीसी हे संविधान सभेने राज्यघटनेचा मसुदा तयार करताना देशाला दिलेले वचन होते, असेही त्यांनी सांगितले.

समान नागरी संहितेवर टीका केल्याबद्दल गृहमंत्र्यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला. ते म्हणाले, धर्मनिरपेक्ष देशात प्रत्येकासाठी एकच कायदा नसावा का? हे धर्मनिरपेक्षतेचे सर्वांत मोठे लक्षण आहे. काँग्रेस ध्रुवीकरणाला घाबरत नाही. ते लाड करीत आहे गुंतलेल्या राजकारणात आणि जी काही व्होट बँक शिल्लक आहे ती मजबूत करायची आहे.

## रायगड लोकसभा मतदारसंघात २१ उमेदवारांचे अर्ज वैध

### सात उमेदवारांचे अर्ज अवैध

**अलिबाग : प्रतिनिधी**




रायगड लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आलेल्या उमेदवारी अर्जांपैकी सात उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत. २१ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २२ एप्रिल आहे. त्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल.

रायगड लोकसभा मतदारसंघात १२ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली. १९ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत होती. या मुदतीत एकूण २८ उमेदवारांचे ४० उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. शनिवारी (दि.२०) रोजी अर्जांची छाननी करण्यात आली. छाननीत २१ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. सात उमेदवारांचे १३ अर्ज अवैध ठरले, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात नामनिर्देशनपत्र सादर केलेल्या उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली. या वेळी निवडणूक आयोगाचे निरीक्षक संजीव कुमार झा यांच्या उपस्थितीत सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्रांची छाननी प्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे, उमेदवार, उमेदवारांचे सूचक, वकील व प्रतिनिधी उपस्थित होते.

छाननीत अनिकेत सुनील तटकरे (एनसीपी), नरेश गजानन पाटील (अपक्ष), मुजफ्फर जैनुद्दीन चौधरी (बहुजन समाज पार्टी), उस्मान बापू कागदी (अपक्ष), अनिल बबन गायकवाड (बहुजन समाज पार्टी), भुपेंद्र नारायण गवते (अपक्ष), संजय घाग (अपक्ष) या सात उमेदवारांचे अर्ज अवैध ठरविण्यात आले.

अनंत गंगाराम गिते (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे), अनंत गिते (अपक्ष), अनंत बाळोजी गिते (अपक्ष), नितीन मयेकर (अपक्ष), आस्वाद पाटील (अपक्ष), मंगेश पद्मा कोळी (अपक्ष), पांडुरंग दामोदर चौले (अपक्ष), सुनील दत्तात्रेय तटकरे (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी), विजय गोपाळ बना (अपक्ष), प्रकाश बाळकृष्ण चव्हाण (भारतीय जवान किसान पार्टी), सुनील दत्ताराम तटकरे (अपक्ष), श्रीनिवास सत्यनारायण मट्टपरती (अपक्ष), अभिजित अजित कडवे (अपक्ष), अजय यशवंत उपाध्ये, (अपक्ष), अस्मिता एकनाथ उंदिरे (अपक्ष), अंजली अश्विन केळकर (अपक्ष), गोपाळ यशवंतराव तंतरपाळे (अपक्ष), अमित श्रीपाल कवाडे, (अपक्ष), मिलिंद काशिनाथ कांबळे (बहुजन समाज पार्टी (आंबेडकर), नंदकुमार गोपाळ रघुवीर, कुमोदिनी रवीद्र चव्हाण (वंचित बहुजन आघाडी) यांचे अर्ज वैध ठरले आहेत.

## नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये अविक मुखर्जीला कांस्यपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इ. ११वीमध्ये शिकत असलेल्या अविक मुखर्जीने नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक पटकाविले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अविक मुखर्जीचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



३० मार्च ते १५ एप्रिलदरम्यान रोहतक, हरियाणा येथे खेलो इंडियाच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यात आले होत. या स्पर्धेत ६.३.५-६७१०९ वजन मज गटात अविकने कांस्यपदक पटकावित यश संपादन केले आहे. या स्पर्धेसाठी त्याला क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्याने मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव एस. टी. गडदे, प्राचार्या निशा नायर यांनीही त्याचे कौतुक केले.

# उद्धव ठाकरे थोडे भ्रमिष्ट झालेत

## ‘त्या’ दाव्याला उपमुख्यमंत्री फडणवीसांचे प्रत्युत्तर

**अमरावती : प्रतिनिधी**

२०१९ला झालेल्या बैठकीचा दाखला देत उद्धव ठाकरे यांनी राज्याच्या मुख्यमंत्रिपदाबाबत मोठा दावा केला. याला आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमचे जुने मित्र उद्धव ठाकरे थोडे भ्रमिष्ट झाले आहेत, असे उत्तर दिले आहे.



एका मुलाखतीदरम्यान उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ ला आपल्याला एक शब्द दिला होता, असा दावा केला. २०१९ ला आदित्यला मुख्यमंत्री बनवून मी दिल्लीला जाईल, असा शब्द देवेंद फडणवीस यांनी मला दिला होता, असे दावा उद्धव ठाकरे यांनी केला आहे. त्याला आता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. आमचे जुने मित्र उद्धव ठाकरे थोडे भ्रमिष्ट झाले आहेत. त्यांच्या बोलण्यातील तफावत आता लोकांसमोर आली आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणालेत. ते अमरावतीत बोलत होते.

आज ते म्हणाले, देवेंद्र फडणवीसांनी मला सांगितले होते की मी आदित्य ठाकरेंना मुख्यमंत्री करेल आणि मी दिल्लीला जाईल. त्यांना वेड लागलं असेल मला तर नाही ना माझा सवाल आहे, कालपर्यंत यांना भ्रम होत होता. अमित शाहांनी त्यांना कोणत्या तरी खोलीत नेऊन तुम्हाला मुख्यमंत्री करतो असे सांगितले. हा त्यांचा कालपर्यंतचा भ्रम होता. आता त्यांचा भ्रम बदलला. आता म्हणतात, देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आदित्यला मुख्यमंत्री करतो, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

उद्धवजी आधी हे ठरवा अमित भाईंनी सांगितले की, देवेंद्रनी सांगितले. अमित भाईंनी सांगितले की तुम्हाला मुख्यमंत्री करतो की देवेंद्रनी सांगितलं आदित्यला मुख्यमंत्री करतो. हे भ्रमिष्ट झालेय. खुर्ची गेल्याने त्यांना काहीच सूचत नाही. त्यामुळे एक खोटे लपवण्यासाठी दुसरे खोटे बोलले जात आहे, असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी ठाकरेंच्या दाव्यावर भाष्य केलेय.

होय मी त्यांना सांगितले होते, आदित्य ठाकरेंना लढवा कारण तुमचा पक्ष नंतर त्याला सांभाळायाचे आहे. काहीतरी ट्रेनिंग तरी त्याला मिळाले पाहिजे, पण आदित्यला मुख्यमंत्री तर सोडाच पण मंत्री बनवण्याचाही विचार नव्हता त्यांच्या पक्षांनी त्यांना मंत्री बनवले नसते. तर पक्षाची अशी हालत झाली नसती, पण यातून एक गोष्ट स्पष्ट झाली की एक तर मी मुख्यमंत्री नाही तर माझा मुलगा मुख्यमंत्री. म्हणूच ते काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत गेले, असे देवेंद्र फडणवीसांनी म्हटले आहे.

## राज्यात अवकाळी; बळीराजा चिंतेत

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या चार दिवसांपासून वातावरण अचानक फिरलं असून अनेक जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा तडाखा बसला आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या फळबागांचे मोठे नुकसान झाले असून बळीराजा चिंतेत पडला आहे.

सोलापूर, पुणे, कोल्हापूर, धाराशिव जिल्ह्यासह कोकणताही मुसळधार पाऊस पडल्याचे दिसून येते. दुसरीकडे कोकणातही सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने जिल्हा प्रशासनाने सतर्कतेचे इशारा दिला आहे. हिंगोली जिल्ह्यातही पावसाने दमदार हजेरी लावली आहे. तर, सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, बार्शी तालुक्यासह विविध ठिकाणी पावसाने झोडपले आहे.

दरम्यान, दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती गावात घडली मन हेलावून टाकणारी घटना घडली असूनमुस्ती गावातील शेतात वीज पडून लावण्या हनुमंता माशाळे या आठ वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. लावण्या माशाळे हिला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# कळंबोलीतील दहा तास वीजेचा ‘खोळंबा’

## कामकाज ठप्प, लाखोंचा फटका

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली वसाहतीमध्ये रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम करण्यासाठी जेसीपीने खणत असताना महाराष्ट्र वीज वितरण कंपनीची ११ केवी क्षमतेची मोठी केबल उखडन्यात आली. त्यामुळे कळंबोलीतील वीजपुरवठा तब्बल दहा तास खंडित झाला.



रस्त्याचे काम करीत असताना संबंधित ठेकेदाराच्या चुकीमुळे वीज गायब झाल्याने कळंबोलीकर पुरते बेहाल होऊन घामाघुम झाले. विजेवर अवलंबून असणारे सर्व कामकाज ठप्प झाल्याने लाखोंचे नुकसान व्यापारी दुकानदार व रहिवाशांना सहन करावे लागले.

कळंबोलीत पनवेल महापालिकेच्या वतीने रस्त्याचे हो मला निसारण वाहिनीचे काँक्रिटीकरण करण्याचे काम सुरू आहे. सेक्टर १० इ मधील अमर हॉस्पिटल जवळ रस्त्याच्या कामासाठी ठेकेदाऱ्याच्या जेसिपी कडून रस्ता खणत असताना जमिनीखालून जाणाऱ्या व कळंबोलीला वीजपुरवठा करणाऱ्या वीज वितरण कंपनीच्या मोठी विद्युत वाहिनी उखडून तोडण्यात आली. त्यामुळे कळंबोलीतील वीजपुरवठा सकाळी दहा वाजल्यापासून खंडित झाला. ही बाब कळंबोलीतील वीज वितरण कंपनीचे अधिकारी गोकुळ सोनवणे यांना समजतात त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

दिवसभर लाईट नसल्याने कळंबोलीकरांचे पुरते बेहाल झाले. एकीकडे प्रचंड उष्माचा आघात सुरू असताना घरात वीज गायब झाल्याने जोपर्यंत रहिवाशांच्या घरातील इन्व्हर्टरमध्ये विज होती तोपर्यंत पंखे सुरू राहिले, मात्र त्यानंतर रहिवाशांचे मोठे हाल झाले. या कालावधीत हौसिंग सोसायटी व इतर भागात वीज नसल्याने पाणीपुरवठासुद्धा होऊ शकला नाही.

याबाबत कळंबोलीतील वीज वितरण कंपनीचे अधिकारी गोकुळ सोनवणे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, ११ केव्ही च्या जमिनीखालच्या वीज वाहिनीच्या दुरुस्तीचे काम आणि सकाळपासून करीत आहोत. संबंधित ठेकेदाराने जर त्याने केलेली चूक लवकरच कबूल केली असती तर हे काम लवकर उरकले असते, मात्र त्यांच्या चुकीचा भुर्दंड वीज वितरण कंपनी व रहिवाशांना सहन करावा लागत आहे. लवकरच वीज जोडणीचे व दुरुस्तीचे काम पूर्ण होऊन कळंबोलीकरांना वीजपुरवठा पूर्ववत केला जाईल असे त्यांनी सायंकाळी साडेसात वाजता सांगितले.

### नागरिक हैराण

***दिवसभर घरात वीज नसल्याने सायंकाळच्या वेळेस घरात अंधार राहिल्याने कळंबोलीतील उद्यानेही मुले आबाल वृद्ध महिला व नागरिकांनी हाउसफुल झाल्याचे चित्र दिसून आले, मात्र दिवसभर विजेचा फटका हा नागरिकांना सहन करावा लागला बहुतांशी व्यवसाय हे विजेवर अवलंबून आहेत. तब्बल दहा ते बारा तास वीज गायब झाल्याने व्यापारी दुकानदार, ब्युटीशियन, गिरणी मालक, ऊसाचे गुराळ, दूध विक्रेते थंडगार व शीतपीय विक्रेते, पिठाची चक्की या सर्वांना त्याचा फटका सहन करावा लागला.***

# सुधागड विद्यालयातील वेदिका सुभेदारला मिळाली जिल्हा शिष्यवृत्ती

**कळंबोली : बातमीदार**

रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळाकडून घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय गणित संबोध परीक्षा परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलातील वेदिका सुभेदार या विद्यार्थिनीने ८४ टक्के गुण प्राप्त करून जिल्हा शिष्यवृत्ती पटकावली आहे. त्याचबरोबर विद्यालयाचाही सन्मान उपक्रमशील शाळा सन्मान पुरस्काराने शाळेलाही शिक्षण विभागाकडून सन्मानित करण्यात आले आहे. विद्यालयाने शैक्षणिक क्रीडा सांस्कृतिक विभागात गगन भरारी घेतल्याने विद्यार्थी व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक व विद्यालयाचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.



रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळाकडून रायगड जिल्ह्यातील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांची गणित संबोध शिष्यवृत्ती परीक्षा दरवर्षी घेतली जाते. २०२३-२४ मध्ये घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेचा निकाल लागला असून पनवेल तालुक्यातून सुधागड एज्युकेशन सोसायटीचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता पाचवी (सेमी इंग्लिश) मधील कुमारी वेदिका पुरुषोत्तम सुभेदार या विद्यार्थिनीने ८४ टक्के गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता शिष्यवृत्ती विद्यार्थी गुणगौरव सन्मान संपादन केला आहे. त्याचबरोबर पाचवीतील २० व आठवीतील २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळ यांच्याकडून शाळेस उपक्रम शाळा सन्मानचिन्ह देण्यात आले.

या शैक्षणिक उपक्रमात गगण भरारी घेणाऱ्या वेदिका सुभेदार या विद्यार्थिनीच शिष्यवृत्ती, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह भेट देऊन पनवेलचे गटशिक्षणाधिकारी सिताराम मोहिते यांनी सन्मानित केले आहे. विद्यार्थिनीच्या वतीने तिचे वडील पुरुषोत्तम सुभेदार व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका वैशाली फुलपगार या वेळी उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी अभिनंदन केले आहे.

# पश्चिम रेल्वेने भंगार विक्रीतून कमावले तब्बल ४६९.२७ कोटी

**मुंबई : प्रतिनिधी**

पश्चिम रेल्वेवर शून्य भंगार मोहिम राबविण्यात येते. या मोहिमेंतर्गत पश्चिम रेल्वेने आर्थिक वर्ष २०२३-२४ भंगार विक्रीतून ४६९ कोटीपेक्षा जास्त कमाई केली आहे.



पश्चिम रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, सर्व स्थानके, विभाग, प्रतिष्ठाने, डेपो, कार्यशाळा, शेड, सर्व रेल्वे स्थाने/विभाग भंगारमुक्त करण्यासाठी शून्य भंगार मोहीम साध्य करण्यासाठी अथक प्रयत्न सुरू आहे. या मोहिमेंतर्गत प्रत्येक विभाग, कारखान्यातील भंगार गोळा करण्यात येते. जूने इंजिन, डिझेल इंजिन, रूळ, जुने किंवा अपघाती इंजिन अथवा डबे यांसह विविध प्रकारच्या भंगाराची विल्हेवाट लावण्यात येते. लोह, स्टील, ॲल्युमिनियम, पितळ, तांबे व इतर धातूच्या भंगाराची विक्री करण्यात येते.

पश्चिम रेल्वेने १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत भंगार विक्रीतून ४६९.२७ कोटी रुपये मिळविले आहे. भंगाराची विल्हेवाट लावल्याने केवळ महसूल मिळवण्यातच मदत झाली नाही तर परिसर स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासही मदत झाली आहे.

# चौकमध्ये हृदयरोग निदान तपासणी शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक कलोते येथील माधवबाग हॉस्पिटल शाखेच्या अंतर्गत तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली मोफत हृदयरोग व आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या हृदय निदान तपासणी शिबिरामध्ये ईसीजी, एसपीओटू, बीएमआय, बीपी, रक्त, हिमोग्लोबिन तपासणी अशा अनेक वैद्यकीय चाचण्या निशुल्क करण्यात आल्या व उपचारादरम्यान आवश्यक अशा औषधाचे मोफत वाटप करण्यात आल्याने शेकडो गरीब,गरजू, कामगारवर्ग तसेच स्थानिक नागरिकांनी या आरोग्य सेवेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.




या कार्यक्रमासाठी आई समाज कल्याण संस्था संस्थापक अध्यक्ष समाजसेवक व दानशूर उद्योजक आरोग्यदूत अब्दुल हाई शेख यांनी आरोग्याबाबत जनजागृती व सतर्क निर्माण व्हावी यासाठी आपल्या संस्थेच्या माध्यमातून आरोग्य दूत नेमले होते. त्यात करुणा ताई, प्रकाश, प्रेरणा, पंकज पाटील आणि अब्दुल रहमान यांनी विशेष मेहनत घेतली होती. माधव बाग व्यवस्थापन टीम व डॉ. तुषार सरांचे संस्थेच्यावतीने विशेष आभार मानले.

**निरोगी समाज देशाच्या सुख-समृद्धीसाठी काळाची मोठी गरज आहे आई समाज कल्याण संस्था वर्षभर अशा आरोग्य सेवा देण्याच्या दृष्टीने कार्य करणे आपलं कर्तव्ये समजते.**

**-अब्दुल हाई शेख, आरोग्यदूत**

# विद्याभवनमध्ये विद्यार्थ्यांसाठी संस्कार शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात शिक्षण घेत असलेल्या सर्व विभागातील विद्यार्थी तसेच शिक्षक आणि पालकांसाठी संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले.



संस्कार शिबिर आठ दिवस चालणार असून बीएआरसीचे सायंटिस्ट के एल मोदी या शिबिरात प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. पौराणिक गोष्टींसह, खेळ, वाचन आणि विविध मूल्यांना स्पर्श करणारे उपक्रम या शिबिरात होणार आहेत. ध्येय ठरवणे, स्मरणशक्ती विकास आणि स्वास्थ्य अशी उद्दिष्टे ठरवण्यात आली आहेत. अशोक खांडेलवाल, सत्यपाल अग्रवाल, कुमकुम कांचन, अमिता गुप्ता, स्नेहा नंदिवाडेकर, निलम गावंड हे गायत्री परिवाराचे साधक या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते. तसेच संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ सर्व विभागाचे मुख्याध्यापक व शिक्षक या वेळी उपस्थित होते.

उन्हाळी सुट्टीमधील विद्यार्थ्यांचा रिकामा वेळ सत्कारणी लागण्यास मदत होत आहे, पाठ्यपुस्तकातील शिक्षणास मूल्य शिक्षणाची जोड दिल्यास शिक्षणाचे उद्दिष्ट साधता येईल, असे या शिबिरातून दिसून आले.

# ‘सीकेटी’त गीत गायनाचा कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमिक आणि मराठी माध्यमिक तसेच इंग्रजी प्राथमिक व मराठी प्राथमिक विभागातील संगीत विभागातर्फे आपल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत जागतिक दर्जाच्या संगीत क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना, जे आज आपल्यातून निघून गेले आहेत, त्यांना आदरांजली म्हणून शास्त्रीय गीत गायनाचा कार्यक्रम शनिवारी (दि. २०) विद्यालयातील हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता.

विद्यार्थ्यांमध्ये संगीत विषयाची आवड निर्माण होण्यासाठी तसेच संगीत क्षेत्रातील दिग्गज अशा कलाकारांची माहिती होण्यासाठी, संगीतातील त्यांचे योगदान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे यासाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयात पहिल्यांदाच होत आहे. या कार्यक्रमात पद्मविभूषण, पद्मश्री डॉ. प्रभाताई अत्रे (शास्त्रीय गायिका), पंडित राशीद खान (शास्त्रीय गायक), पंडित पंकज उधास (शास्त्रीय गजल गायक), पंडित भवानी शंकर (जगत विख्यात पखवाज वादक या कलाकारांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता विद्यालयातील संगीत शिक्षक अर्चना मॅडम, रूपेश मढवी व संतोष खरे यांनी विशेष मेहनत घेतली. हा नाविन्यपूर्ण उपक्रम संपूर्ण यशस्वी होण्याकरिता विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण व पर्यवेक्षिका यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.



# उन्हाळी सुट्ट्यांमध्ये रेल्वेच्या अतिरिक्त ९१११ फेऱ्या

**रोहे : प्रतिनिधी**

प्रवाशांचा प्रवास सुखावह व्हावा यासाठी तसेच उन्हाळ्यात प्रवाशांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी, भारतीय रेल्वे उन्हाळी सुट्ट्यांच्या हंगामात विक्रमी ९१११ फेऱ्या चालवणार आहे.

२०२३ च्या उन्हाळ्याच्या तुलनेत ही संस्था लक्षणीय वाढ दर्शवते. २०२३च्या उन्हाळी हंगामात एकूण ६३६९ फेऱ्या रेल्वेकडून चालवण्यात आल्या होत्या. यावर्षी फेऱ्यांच्या संख्येत २७४२ फेऱ्यांची वाढ करत भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या मागण्या प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठीची आपली वचनबद्धता सिद्ध केली आहे.

प्रमुख रेल्वे मार्गांवर विना अडथळा प्रवासाची सोय उपलब्ध करून देत देशभरातील प्रमुख गंतव्यस्थानांना जोडण्यासाठी अतिरिक्त गाड्यांचे काटेकोरपणे नियोजन करण्यात आले आहे. तमिळनाडू, महाराष्ट्र, गुजरात, ओडिशा, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, झारखंड, मध्य प्रदेश, राजस्थान आणि दिल्ली यांसारख्या राज्यांतील उन्हाळी सुट्ट्यांच्या दरम्यान प्रवाशांच्या गर्दीसाठी प्रवासाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी भारतभर पसरलेल्या सर्व विभागीय रेल्वेनी या अतिरिक्त फेऱ्या चालवण्याची तयारी केली आहे.

उन्हाळी सुट्ट्यांच्या हंगामात रेल्वे स्थानकांवर पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या सूचना विभागीय रेल्वेंना देण्यात आल्या आहेत. सर्व प्रमुख आणि महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांवर गर्दी नियंत्रणाची विस्तृत व्यवस्था करण्यात आली आहे. या स्थानकांवर शिस्तबद्ध पद्धतीने गर्दीचे नियमन करण्यासाठी आणि सर्व हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी वरिष्ठ अधिकारी तैनात असतील.

प्रचंड गर्दीच्या काळात चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती टाळण्यासाठी सरकारी रेल्वे पोलीस आणि रेल्वे संरक्षण दल कर्मचारी गर्दीचे सुरळीतपणे नियमन करण्यासाठी फूट-ओव्हर ब्रिजवर तैनात असतील. सर्व प्रवाशांना सोयीस्कर आणि आरामदायी प्रवासाची अनुभूती मिळवून देण्यासाठी भारतीय रेल्वे वचनबद्ध आहे.

रेल्वे तिकीट खिडकी किंवा IRCTC संकेतस्थळ किंवा ॲपद्वारे प्रवासी या अतिरिक्त गाड्यांमध्ये त्यांचे तिकीट आरक्षित करू शकतात.

## निवडक

### प्रवासादरम्यान दागिने, पैसे चोरीस

**पनवेल :** बसमध्ये प्रवास करत असताना पर्समधील रोख रक्कम व सोन्याचे दागिने चोरून नेल्याप्रकरणी अज्ञात विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अश्रफ अलिबागवान यांचे आई व भाऊ कोल्हापूर ते मुंबई जाणाऱ्या ट्रॅव्हल्स बसने पनवेलमध्ये आपल्या घरी आले. दुसऱ्या दिवशी त्यांनी पर्स उघडून पाहिली असता त्यामध्ये रोख पैसे व दागिने सापडून आले नाहीत. त्यामुळे त्यांनी प्रवासादरम्यान रोख रक्कम व दागिने अज्ञाताने चोरून नेल्याची तक्रार दाखल केली आहे.

### तळोजामध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्यांच्या



नातेवाईकांचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत. अनोळखी व्यक्तीचे अंदाजे वय ५० वर्ष, रंग सावळा, अंगाने मध्यम, केस पांढरे, नाक सरळ, डोळे बंद, बेहरा उभट असून त्याने निळ्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट आणि पायान फिक्कट निळया रंगाची जिन्स पॅन्ड घातलेली आहे. या इसमाचा कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाण्याची संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मासळीचा दुष्काळ; मच्छीमार चिंतेत

**उरण : वार्ताहर**

सातत्याने होणारे हवामानातील बदल, समुद्रातील वाढता मानवी हस्तक्षेप आणि वाढत्या जलप्रदूषणामुळे दिवसेंदिवस माशांचा साठा कमी होत चालला आहे. कधीकाळी राज्याच्या सागरी जलाधिक्षेत्रात मुबलक मिळणारी मत्स्य संपदा आणि तिच्यावर उपजीविका करणारे लाखो मच्छीमारांना मागील काही वर्षांपासून मासळीच्या दुष्काळाशी झुंजावे लागत आहेत.



सागरी मासेमारीला तर मुळातच अनेक मर्यादा आहेत. त्यातच समुद्रातील वाढत्या प्रदूषणामुळे अनेक प्रजातींचे मोठ्या प्रमाणावर मासे मृत्युमुखी पडत आहेत. तर काही प्रजाती स्थलांतर करीत आहेत. जागतिक तापमान वाढीमुळेही माशांसह समुद्रातील एकंदरीतच जीवसृष्टीवरच अनिष्ट परिणाम होत आहे. अरबी समुद्र तसेच बंगालच्या उपसागरातील काही भागांमध्ये झीरो ऑक्सिजन झोन निर्माण झाले आहेत. त्यामुळे अशा भागांतून काही प्रजातींचे मासे इतरत्र स्थलांतरित होत आहेत. घोळ, जिताडा, शेवंड, बोंबील, मांदेली, कर्ली, कोळंबी, पापलेट, सुरमई तसेच खेकडे याचबरोबर इतर अनेक प्रजातींचे समुद्रातील अस्तित्व मागील काही वर्षांपासून कमी झाले आहे. यावर कहर की काय, बेकायदेशीर पर्ससीन, एलईडी मासेमारीचा होणारा अतिरेक याचा मोठा परिणाम पारंपरिक मच्छीमारांच्या आर्थिक उत्पन्नावर झाला असल्याचे मच्छीमारांकडून सांगितले जात आहे.

तसेच राज्याच्या सागरी हद्दीत घुसखोरी करून कोट्यवधींची मत्स्य संपदा हडप करणाऱ्या कर्नाटक, गुजरात राज्यांतील हायस्पीड ट्रॉलर्सनींही राज्यातील पारंपरिक मच्छीमारांचे जगणे कठीण करून टाकले आहे. समुद्रातील वाढते जलप्रदूषण, अनियंत्रित परराज्यांतील यांत्रिक तसेच यंत्रचलित मासेमारी नौकांवर प्रतिबंध घालाण्याची व अवैध पर्ससीन, एलईडी मासेमारीवरील बंदी केवळ कागदावरच राहिली आहे.मासळीची घटती उत्पादकता आणि नौकांची कमी होणारी संख्या यामुळे मासेमारी व्यवसायावर गंडांतर आले असल्याचे फिशर कॉग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष मार्तंड नाखवा माहिती देताना सांगितले.

मागील काही वर्षांपासून मासेमारी व्यवसाय धोक्यात आल्याने तर मासेमारी उद्योगातील नौकांचे प्रमाण कमी होत चालले असल्याचेही समोर आले आहे. मासेमारीसाठी लाखो रुपयांची गुंतवणूक करून खर्च केलेली रक्कमही वसुल होत नसल्याने मच्छीमारांचा मासेमारी नौका विकण्याकडे कल वाढत चालला आहे.तसेच मासेमारीच्या हंगामात अनेक नैसर्गिक संकटांमुळे मासेमारीचे दिवस वाया जात असल्याने त्यांना नाहक आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याच्या मच्छीमारांच्या तक्रारी आहेत.

सरकारने सागरी मासेमारीचे संवर्धन, व्यवस्थापन आणि विकास ब्लू इकॉनॉमीच्या माध्यमातून करण्याचेही ठरविण्यात आले आहे. मत्स्य उत्पादन वाढीबरोबर निर्यातवृद्धीसाठी मागील काही वर्षांच्या केंद्रीय अर्थसंकल्पात बऱ्यापैकी आर्थिक तरतूदही केली जात आहे, परंतु या सर्वांचे अपेक्षित परिणाम मात्र दिसत नसल्याचे मच्छीमार व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

# पनवेलमध्ये पोलिसांचे ऑल आउट ऑपरेशन

## लोकसभा निवडणुकीसाठी ॲक्शन मोड

**पनवेल : वार्ताहर**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरती पनवेल तालुका पोलिसांनी राबवले हद्दीमध्ये ऑल आउट ऑपरेशन राबवून मोठ्या प्रमाणात कारवाई केली आहे.



पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अनिल पाटील, पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर आदींच्या उपस्थिती मध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वेगवेगळ्या ठिकाणी ऑल आउट ऑपरेशन राबवून त्यामध्ये प्रामुख्याने अंमली पदार्थ विरूद्ध कारवाई, अंमली पदार्थाचे सेवन करणारे दोन व्यक्तींवर कारवाई, भारतीय हत्यार कायदा ४(२५) प्रमाणे एक लोखंडी धारदार घातक शस्त्र जप्त केले, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ६५(ई) अन्वये एकूण नऊ गुन्हे दाखल करून देशी, विदेशी व हातभट्टी दारू (विनापरवाना विक्री) जप्त केली आहे, त्याचप्रमाणे कोपटा क्ट अंतगर्त १७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे, त्याचप्रमाणे बार वर कारवाई करून ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

यासोबत, हद्दीतील गुंड हिस्ट्रीशीटर यांची तपासणी केली असता हिस्ट्रीशिटर तीनपैकी तीन मिळून आले. त्याचप्रमाणे गुंडा रजिस्टरमधील १९ पैकी १० मिळून आले आहेत तसेच प्रतिबंधक कारवाईसुद्धा करण्यात आल्या आहेत, त्याचप्रमाणे हद्दीकडे दोन ठिकाणी नाकाबंदी करून ३१ वाहनांवर मोटर वाहन कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. कारवाई मध्ये सात सहाय्यक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक व ५७ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.

## अभियंत्याला १५ लाखांचा गंडा

**पनवेल :** खांदेश्वर येथील एका ४५ वर्षीय अभियंत्याची १५ लाख रुपयांची फसवणूक ऑनलाईन गुंवतणूकीद्वारे झाली आहे. जानेवारी ते फेब्रुवारी यादरम्यान ही फसवणूक झाली आहे. खांदेश्वर वसाहतीमधील सेक्टर ६ मधील निललेक व्ह्यू या इमारतीमध्ये फसगत झालेला अभियंता राहतो. जानेवारी महिन्यात या अभियंत्याच्या मोबाईलवरील टेलिग्राम ॲपवर BUCCA_msk खात्यावरून फ्यूचर फोरच्युन ग्लोबल या खात्यावर फोरेक्स ट्रेडींगची माहिती मिळाली. विश्वास संपादन करण्यासाठी भामट्यांनी संबंधित अभियंत्याच्या खात्यामध्ये चार हजार रुपये पाठवले. गुंतवणूकीमध्ये लाभ झाल्याने या अभियंत्याने विविध १० बँकांच्या खात्यामध्ये १५ लाख सहा हजार ६५७ रुपयांची गुंतवणूक केली. त्यानंतर काही दिवसात अभियंत्याला त्याची फसवणूक झाल्याचे समजले. सध्या याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# पाताळगंगेच्या पाण्यावर जलपर्णीचे जाळे

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदी किनाऱ्यावरील श्री गजानन महाराज मंदिराजवळील नदिपात्रात दोन अडिच एकरपेक्षा जास्त जलपर्णीचे जाळे पसरले असल्याने, पाताळगंगा नदीवर मासेमारी करून जीवन जगणाऱ्या आदिवासी व भोई बांधवांत नाराजी दिसून येत आहे.

गेल्या काही दिवसांपासून नदीतील पाण्यावर जलपर्णीचे रान माजल्याने जणूकाही खेळाचे मैदान असल्याचे वाटू लागले आहे. पाण्यावर असलेली ही जलपर्णी पाहून जंगल निर्माण झाल्याचा भास पाहणाऱ्यांना होत आहे.

दरम्यान, गजानन महाराज मंदिराजवळ पाताळगंगेतील पाणी अडविले जाते, परंतू जलपर्णी वनस्पतीमुळे पाण्याचा प्रवाहावर परीणाम होत असून, या जलपर्णीत लहान जीव मृत होवून अडकून बसतात. या भागात जलपर्णी वनस्पती पाण्यात पसरल्याने, नदी न वाटता एखादे मोठे खेळाचे मैदान असल्याचा भास होत आहे. यामुळे मासेमारी व्यवसाय करणाऱ्यांना या जलपर्णीमुळे मासेमारी करणे धोक्याचे झाले असून, कुटूंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न कठीण होऊन बसला असल्याचे आदिवासी बांधवांनी सांगितले.






**पनवेल : महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप शहर अध्यक्ष अनिल भगत, संजय भगत, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, केदार भगत, भरत जाधव आदी उपस्थित होते.**

# कामोठ्यात भीम गीतांचा कार्यक्रम उत्साहात

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंती सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपुर्ण वातावरणात रविवारी साजरी झाली. जयंत्तीनिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याअंतर्गत भारतीय जनता पक्ष कामोठे मंडळ यांच्या वतीने आपल्या भारदस्त आवाजाने अख्ख्या महाराष्ट्राला थिरकायला लावणारे गायक आनंद शिंदे यांच्या भिमगितांच्या कार्यक्रमाचे आयोजन कामोठे सेक्टर ११ येथील नालंदा बुद्ध विहार मैदानात युवा नेते हॅप्पी सिंग यांनी केले होते.





या कार्यक्रमाला मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी महापौर डॉक्टर कविता चौतमोल, कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, ॲड. प्रकाश बिनेदार, विजय चीपळेकर, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, हरजिंदर कौर, युवा नेते हॅप्पी सिंग, विद्या तामखडे, सुशील शर्मा, प्रदीप भगत, माजी जिल्हा परिषद माजी सदस्य अमित जाधव, भाजप नेते के.के.म्हात्रे, महिला मोर्चा कामोठे शहर अध्यक्षा वनिता पाटील, मयूर मोहिते, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, भाऊ भगत, नालंदा बुद्ध विहारचे अध्यक्ष रवींद्र कांबळे, आरपीआय कामोठे शहराध्यक्ष मंगेश दिवाण यांच्यासह पदाधिकारी, सदस्य आणि भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.











**पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारार्थ पनवेल परिसरात भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते आणि पदाधिकारी उत्साहात प्रचार करीत आहेत. मालडुंगे गाव, तडपटटी गाव, बापदेव वाडी, लहान धामणी, देहरंग गाव, टॉवर वाडी, सतीची वाडी, टॉवर वाडी, औषाचीवाडी तसेच नवीन पनवेल परिसरामध्ये श्रीरंग बारणे यांचा जोरदार प्रचार करण्यात आला. या वेळी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रचार पत्रकांचे वाटप मतदारांना करत श्रीरंग बारणे यांना विजयी करण्याचे आवाहन करत आहेत.**

# पालकांसह मुलांना १३० हेल्मेटचे वाटप

## ■ सेवा सहयोग फाऊंडेशनचा उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

सेवा सहयोग फाऊंडेशन मुंबईच्या वतीने पालकांना आणि त्यांच्या मुलांना १३० हेल्मेटचे वाटप पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये असलेल्या कश्यप हॉलमध्ये झाले.

सेवा सहयोग फाऊंडेशन मुंबई खूप साऱ्या प्रकल्पामध्ये काम करत आहे. ग्रामविकास, स्कूल किट, विद्यार्थी विकास शिष्यवृत्ती, बुक बँक, फिरती विज्ञान प्रयोगशाला, कम्यूनिटी नॉलेज हब, अभ्यासिका आणि राईट टू सेफ्टी अश्या खूप साऱ्या प्रकल्पावर त्यांच्या माध्यमातून काम सुरु आहे. त्यानुसार पनवेल तालुका पोलीस स्टेशन मध्ये सेवा सहयोग फाऊंडेशन मुंबई यांच्या विद्यमाने आयसीआयसीआय लोंबार्ड यांच्यातर्फे पालकांना आणि त्यांच्या मुलांना १३० मोफत हेल्मेट वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, सेवा सहयोग फाऊंडेशनचे प्रतिनिधी जयश्री सानप, माधवी पाटील, गणेश संसारे आणि सूरज शिंदे उपस्थित होते.

या कार्यक्रमात जयश्री सानप यांनी सेवा सहयोग फाऊंडेशन यामध्ये चालणाऱ्या प्रकल्पांबाबत माहिती दिली तसेच टू व्हीलर चालवताना आपण हेल्मेट का वापरावे आपली सुरक्षितता आणि आपल्या कुटुंबाची सुरक्षितता कशी घ्यावी याबद्दल माहिती दिली. ट्रॅफिक पोलीस आणि त्यांच्या मुलाला ज्युनिअर रायडर हेल्मेट असे दोन हेल्मेट का दिले. याबद्दल खूप छान अशी माहिती दिली.

दरम्यान, आत्तापर्यंत पेण, रायगड, पालघर, नवी मुंबई, ठाणे, मुंबई, मुरबाड, अश्या बऱ्याच शाळांमध्ये मुलांना आणि त्यांच्या पालकांना ५०००० हेल्मेटचे वाटप करण्यात आल्याची माहिती संस्थे कडून देण्यात आली.



# 'बरसात' ७५ वर्षे

## बरसात मे हमसे मिले तुम...








'बरसात' असं म्हणताक्षणीच आर. के. फिल्मचा सुपरिचित म्हणा वा रसिकांच्या किमान तीन पिढ्यांच्या माईंडमध्ये सेट झालेला म्हणा 'ट्रेड सिम्बॉल' डोळ्यासमोर येणारच. डाव्या हातात गिटार घेतलेला नीली आंखोवाला राज कपूर व त्याच्या उजव्या हातावर विश्वासाने मंत्रमुग्ध झालेली नर्गिस....एकाद्या चित्रपट निर्मिती संस्थेच्या अशा लोगोला स्वतःची ओळख असणे, त्याला ग्लॅमर असणे, त्यामुळे त्या बॅनरचे चित्रपट अथवा चित्रपटांमुळे अनेक वर्ष ओळखले जात असलेले अनेक चित्रपट हेदेखील मोठे यशच.... हा लोगो आर. के. फिल्मचे कला दिग्दर्शक एम. आर. आचरेकर यांचे रेखाटन आहे. मूळ कृष्ण धवल असलेले हे रेखाटन कालांतराने रंगीत झाले ते जागतिक ख्यातीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांच्या कुंचल्यातून. आर. के. फिल्मचा पहिला रंगीत



चित्रपट राज कपूर दिग्दर्शित 'संगम' (१९६४)च्या वेळेस हा योग आला. हा संदर्भ सर्वप्रथम समजला तो बाळासाहेबांच्या निधनाच्या वेळेस (१७ नोव्हेंबर २०१२) मनोजकुमारने एका इंग्रजी वृत्तपत्राला मुलाखत देताना हे सांगितले. काही वर्षातच दिग्दर्शक राहुल रवैल यांच्या आत्मचरित्रातही हा तपशील आहे.

'बरसात' असा अनेक संदर्भात वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट. २१ एप्रिल १९४९ रोजी प्रदर्शित झालेल्या या क्लासिक चित्रपटाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत आणि अशा मोठ्या यशस्वी प्रवासानंतरही हा चित्रपट आपली ओळख देतो. त्यानंतरही राजकुमार संतोषी दिग्दर्शित (१९९५) आणि सुनील दर्शन दिग्दर्शित बरसात (२००५) या नावाचे चित्रपट आले (दोन्हीत बॉबी देओल हीरो. राजकुमार संतोषी दिग्दर्शित 'बरसात'च्या वेळेस बॉबी देओलच्या पहिल्या चित्रपटासाठी ते नाव आपल्या विजयता फिल्म या बॅनरखालील चित्रपटाला मिळावे म्हणून धर्मेंद्रने रणधीर कपूरशी संवाद केल्याचा किस्सा गाजला) तरी 'बरसात' म्हटलं की आर. के. फिल्म बॅनर, आर. के. स्टुडिओ निर्मिती संस्था, राज कपूर व नर्गिस ही लोकप्रिय जोडी आणि त्यातील सर्वच्या सर्व दहा सुपरहिट गाणी हेच आठवते.

'बरसात'चा मुहूर्त १९४७च्या दसऱ्याच्या दिवशी झाला. आपल्या चित्रपटाचा मुहूर्त गाण्यांनी करायचा ही राज कपूर पद्धत. यावेळी दोन गाण्यांचे रेकॉर्डिंग करण्यात आले. संगीतकार शंकर सूर्यवंशी आणि जयकिशन पांचाळ. अर्थात शंकर जयकिशन. तेव्हा ते पृथ्वीराज कपूर यांच्या पृथ्वी थिएटर्स या नाट्यसंस्थेच्या रंगपटात रात्री वाद्य वाजवत. शंकर तबला तर जयकिशन पेटी वाजवत. राज कपूरने त्यांना चित्रपटाचे संगीतकार म्हणून 'बरसात'च्या वेळेस पहिली संधी दिली.

'बरसात'मधील प्रेमिकाचं (राज कपूर) प्रेयसीवरील (नर्गिस) प्रेमाची रित काही वेगळीच आणि तीच त्या काळातील चित्रपट रसिकांना भारी आवडली. हा प्रियकर झिंज्या पकडून नायिकेला जवळ ओढतो. छातीशी धरतो. अशातच तो तिच्या थोबाडीतही लावतो (त्याचं प्रेमच त्याला हा हक्क देतो.) त्याचा हा आक्रस्ताळेपणा ('आवारा'पन) प्रेयसीला आवडायचं. हे सगळेच प्रेमाच्या 'बरसात'मधील एक रंग.



तो पडद्यावरील प्रेयसीला आणि ती भूमिका साकारत असलेल्या नर्गिसलाही आवडतेय हे 'कॅमेरा' लपवू शकत नव्हता. हे प्रेम, हे आलिंगन, ही मस्ती काही वेगळीच होती.

'आग'पासून 'जागते रहो'पर्यंत अशा १६ चित्रपटात राज कपूर व नर्गिस एकत्र आले. या प्रवासात राज कपूरमधील रोमान्स, दिग्दर्शक, गीत संगीताचा आणि संकलन असा सगळाच बहर आला आणि नर्गिसची त्याला पडद्यावर व पडद्यामागेही उत्तम साथ मिळाली. (त्यातून जन्माला आलेले गॉसिप्स आजही चघळले जातेय). ते जणू खरे खुरे अर्थात प्रत्यक्षातील पती पत्नी असावेत अशी त्यांची केमिस्ट्री जमली होती. त्यात काही चित्रपट आर. के. फिल्मचे होते तसेच काही चित्रपट अन्य बॅनरखालील होते. (उदाहरणार्थ मेहबूब खान दिग्दर्शित 'अंदाज')

'बरसात'ची वैशिष्ट्य अनेक. या चित्रपटाच्या यशानंतर राज कपूरने चेंबूरला भव्य आर. के. स्टुडिओची उभारणी केली. 'बरसात'च्या अगोदर राज कपूरने वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षी आग (१९४८) या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. पाठोपाठ आलेला 'बरसात' हा त्या काळातील चित्रपट अभ्यासकांच्या मते एक अतिशय मुक्त, मनस्वी, मनभावी चित्रपट. जितका उच्छृंखल तितकाच भावसखोल. या चित्रपटाची संपूर्ण देशात चर्चा रंगली. त्यानंतर राज कपूरने आवाराचे दिग्दर्शन केले. तर याच यशानंतर राज कपूर व नर्गिस यांनी आग, जान पहचान, प्यार, अंबर, अनहोनी, आशियाना, बेवफा, आह, धुन, पानी, श्री ४२०, चोरी चोरी, जागते रहो या चित्रपटात एकत्र काम केले.


झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक


'बरसात' निर्मितीच्या दिवसांतील एक बहुचर्चित गोष्ट.

नर्गिस अजून 'आर. के. फिल्म'मय झाली नव्हती आणि अन्य बॅनरखालील चित्रपटांतही भूमिका साकारत होती. त्यात ती के. बी. लाल दिग्दर्शित 'अंगारे' या चित्रपटाच्या नासिर खानसोबत भंडारदरा येथील आऊटडोअर्सला शूटिंग करत होती. तर राज कपूर 'बरसात'साठी निम्मीसोबत पांचगणी येथे शूटिंग करत होता. खरं तर 'बरसात 'ची थीम पाहता कश्मीरमध्ये शूटिंग करणे आवश्यक होते, पण ते त्या काळात अधिकच खर्चिक असल्याने काही शूटिंग कश्मीरला केल्यावर पाचगणीत ते करत काश्मिरचा फिल देण्याचा प्रयत्न होता. (काश्मिरला शूटिंग झालेला हा पहिला चित्रपट) नर्गिसला पाचगणीतील शूटिंगची कल्पना आली. तिने एका रात्री दहा वाजता राज कपूरला पाचगणीला ट्रंकॉल लावला. तेव्हा तेच शक्य होतं. खरं तर त्यानंतर रात्रीच पाचगणीवरून निघून भंडारदराला जाऊन पुन्हा सकाळपर्यंत परत येणे अवघड होते, पण तरीही राज कपूरने आपले सहाय्यक दिग्दर्शक राजा नवाथे आणि ध्वनिमुद्रक अल्लाउद्दीन यांना घेऊन भंडारदराला जाण्याचा निर्णय घेतला. रात्री दीड वाजता ते भंडारदरा येथे पोहचले, नर्गिसला भेटले आणि सगळे पुणे शहरात एका हॉटेलमध्ये आले. सकाळी राजा नवाथे यांनी आपल्या 'बरसात' च्या शूटिंगची राज कपूरला कल्पना दिली. राज कपूरने निर्णय घेतला. तो नर्गिसला भंडारदराला सोडायला जाणार आणि राजा नवाथे यांनी पाचगणीला जावून निम्मीच्या काही पासिंग दृश्याचे शूटिंग करावे.

'बरसात' दोन मित्रांच्या दोन भिन्न स्वभावाच्या व स्वरुपाच्या प्रेमकथा. एक प्रेम प्राण (राज कपूर) आणि रेश्मा (नर्गिस) यांचे तर दुसरे प्रेम गोपाल (प्रेमनाथ) आणि नीला (निम्मी) या जोडीचे. या जोडीवरचे पतली कमर है या नृत्य गीताची क्रेझ भारीच होती आणि प्रेमनाथच्या अनेक वैशिष्ट्यांतील एक हे गाणे आहे. निम्मीचा हा पहिलाच चित्रपट.

काळ कितीही पुढे सरकला तरी काही चित्रपट कलाकृती कायमच आजच्याच राहतात, याचे श्रेय त्यातील प्रत्येकाचा आत्मियतेचा सहभाग आणि अशा अनेक महान क्लासिक चित्रपट कलाकृती पूर्वी पडद्यावर आल्या, चित्रपट रसिकांना त्या विलक्षण भावल्या.

राज कपूरचे गुरु केदार शर्मा यांच्या मते 'बरसात' राजकपूरचा सर्वोत्कृष्ट चित्रपट. एक भावमधुर निसर्गरम्य आणि संगीतमय चित्रपट म्हणून 'बरसात'चा उल्लेख केला जातो

या चित्रपटातील 'बस करो, अब तो मै आ गयी ना' हा नर्गिसच्या तोंडचा संवाद त्या काळी खूपच गाजला होता. 'बरसात'द्वारा शंकर-जयकिशन सारखे संगीतकार, शैलेंद्र सारखे गीतकार, हसरत जयपुरी, हे नावारुपाला आले. शैलेंद्र यांनी 'बरसात में हमसे मिले तुम...' आणि 'पतली कमर है, तिरछी नजर है' ही दोन गाणी लिहिली.' रामानंद सागर यांनी या चित्रपटाची पटकथा लिहीली होती. रामानंद सागर यांचा हा लेखक म्हणून पहिला चित्रपट होता. (काही वर्षांनी ते चित्रपट दिग्दर्शक झाले.) अभिनेते प्रेमनाथ व अभिनेत्री निम्मी रूपेरी पडद्यावर प्रथमच झळकले. या चित्रपटाने मुंबईत डॉ. भडकमकर मार्गावरील (पूर्वीचा लॅमिन्टन रोड) इंपिरियल थिएटरमध्ये खणखणीत रौप्यमहोत्सवी यश संपादले. कलकत्त्याच्या पॅराडाईज सिनेमागृहात तो ११४ आठवडे धो धो चालला. बरसातमधील गाणी एकापेक्षा सरस होती. एकाच चित्रपटातील सर्वच गाणी दर्जेदार म्हणूनच लोकप्रिय हे पूर्वीचे हुकमी समीकरण. (आणि आज? पिक्चर संपला की गाणी विसरली जातात.)

छोड गए बालम, हवा में उडता जाए, जिंदगी में हरदम रोता, बरसात में हमसे मिले तुम, जिया बेकरार है, मुझे किसी से प्यार, पतली कमर है, बिछडे हुए परदेसी, अब मेरा कौन सहारा, मेरी आँखों में बस अशी दहा गाणी या चित्रपटात होती. 'छोड गये बालम, मुझे हाय अकेला छोड गये.. बरसात में हमे मिले तुम सजन तुमसे मिले हम...', 'हवा में उडता जाये, मेरा लाल दुपट्टा मलमलका' या गाण्यांनी सिनेरसिकांना अक्षरशः वेड लावले. त्या काळात रेडिओ, उच्च मध्यमवर्गीयांच्या घरातील ग्रामोफोन, इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्स, वाद्यवृंद हीच गाणी ऐकण्याची प्रमुख माध्यमे. अशा वेळी हिच आवडती गाणी पडदाभर पाहण्यासाठी पुन्हा पिक्चरला जाणे हाच आवडता मार्ग होता. अशा लोकप्रिय गाण्यांमुळे एका पिढीतील हा चित्रपट अनेक पिढ्या ओलांडूनही हिट आहे. आर. के. फिल्मची दर्जेदार लोकप्रिय गाणी हे कायमच वैविध्य ठरले आहे.

'बरसात मे हमसे मिले तुम...' एका क्लासिक चित्रपटाच्या पंचाहत्तरीनिमित्त हा फोकस.

# भगवान महावीर आणि अहिंसा

अहिंसा तत्त्वाची मीमांसा जैन धर्मामध्ये अतिशय बारकाईने, सूक्ष्मपणे केलेली आहे. हिंदू धर्मातील संन्याशाला जी व्रते पाळावी लागतात, त्यामध्ये अहिंसा हे पहिले व्रत आहे. त्याचप्रमाणे बौद्ध धर्मातील 'अष्टांगशील' किंवा 'पंचशील' यामध्येही अहिंसेला प्रथम स्थान आहे. येशू ख्रिस्तानेदेखील आपल्या अनुयायांना 'तू प्राणीहत्या करू नकोस' अशी एक आज्ञा दिली आहे. महाभारतात तसेच हिंदू धर्मग्रंथात 'अहिंसा परमो धर्म:' असे वारंवार सांगितले आहे. महात्मा बसवेश्वर आपल्या वचनामध्ये म्हणतात...

*नको करू चोरी,*
*नको करू हत्या*
*नको कोणा रागावू,*
*नको बोलू मिथ्या*
*हीच अंतरंग शुद्धी,*
*हीच बहिरंग शुद्धी*

भगवान महावीरांनी अठरा धर्मस्थानात प्रथम स्थान अहिंसेला दिले आहे. अहिंसा त्रस आणि स्थावर सर्व प्राण्यांचे कुशल क्षेम व कल्याण करणारी आहे. सर्व प्राण्यांबद्दल संयम ठेवणे म्हणजेच अहिंसा. जगातील सर्व प्राण्यांशी, मग ते शत्रू असोत की मित्र, समभावाने वागणे म्हणजे अहिंसा. भगवान महावीर म्हणतात...

*अहिंसा तस-स्थावर*
*सव्वभूज खेमंकरी*
*सव्वभूएस् संजमो*
*समयासव्वभूएसु,*
*सत्तुमित्तेसु वा जगे*

भगवान महावीर म्हणतात, सर्व प्राण्यांना आपला जीव प्यारा असतो. सुख सर्वांना चांगले वाटते व दु:ख वाईट. वध सर्वांना अप्रिय आहे व जीवन प्रिय. सर्व प्राणी जगू इच्छितात. काहीही होवो. सर्वांना जीवन प्रिय असते. म्हणून कोणत्याही प्राण्याची हिंसा करू नका. भगवान महावीर म्हणतात, प्राण्यांना पीडा देणाऱ्या सर्व प्रवृत्तींचा आयुष्यभर त्याग करीत राहणे हे कठीण आहे. पणतीच खरी अहिंसा आहे. भगवान महावीर म्हणतात, सर्व प्राणीमात्रांशी मैत्री ठेवा. कोणाही प्राण्यास मन-वचन-कायेने दुखवू नका. मानवी हृदयात करुणेचा प्रवाह सतत वाहत राहिला पाहिजे. याला सामान्य



मानवाच्या भाषेत दयाभाव म्हणतात. सैद्धांतिक शब्दात अहिंसा म्हणतात.

अनंत खेर यांनी लिहिलेली एक कथा आपण वाचली असेल. एकदा एक कैदी जेलमधून फरार झाला. पळता पळता तो जंगलात गेला. त्याला एक वाघ झोपलेला दिसला. कैदी घाबरला, पण हळूहळू तो वाघाच्या जवळ गेला. वाघाने त्याचा पाय कैद्यासमोर केला. कैद्याने वाघाच्या पायातील काटा काढला. काही वर्षांनंतर राजाने कैद्याला जेलमधून पळून जाण्याची शिक्षा सुनावली. कैद्याला आता भुकेल्या वाघासमोर देण्यात येणार होते. जेव्हा खरोखरच तशी वेळ आली, तेव्हा वाघ कैद्याचे तळपाय चाटायला लागला, कारण हा तोच वाघ होता ज्याच्या पायातील काटा या कैद्याने काढला होता. याचा भावार्थ हाच की जीवनात दया करावी, चांगलं करावं. कधीतरी त्याची प्रचिती येतेच.

पाच अणुव्रत-अहिंसाणुव्रत, सत्याणुव्रत, अचौर्याणुव्रत, ब्रम्हचर्याणुव्रत, परिग्रहपरिमाणाणुव्रत, अणुव्रतांना दृढ करणारे; विकास करणारी तीन व्रत आहेत- दिग्व्रत, अनर्थदंडविरतिव्रत, भोगोपभोगपरिमाणव्रत; मुनीव्रत धारण करण्याचे शिक्षण-प्रशिक्षण मिळते. त्यास शिक्षाव्रत म्हणतात, ती चार आहेत- देशावकाशिक, सामायिक, प्रोषधोपवास, याप्रमाणे श्रावकाची बारा व्रते सांगितली आहेत.

जैन धर्मात अहिंसेला पहिले स्थान दिले आहे. अहिंसाहा परम धर्म आहे. अहिंसा व्रताने इतर व्रतांचे पालन केले जाते. त्रस जीवांचे नाक-कान टोचणे, कापणे, त्रस जीवांना बांधून ठेवणे अथवा बंधनात ठेवणे, पोपट-मैना इत्यादी पक्ष्यांना पिंजऱ्यात डांबून ठेवणे, घोडे, बैल, उंट, गाढव इत्यादी पशूंच्या पाठीवर अधिक ओझे लादणे, कुणाच्या अन्न-जलामध्ये अडथळा आणणे, नोकरांना वेळेवर अन्नपाणी न देणे, वाईट अन्न-जल देणे, कोणावर अधिक आर्थिक भार लादणे, कोणाच्या लाचारीचा फायदा घेणे, शोषण करणे, स्वत:मध्ये काम करण्याची शक्ती असूनसुद्धा दुसऱ्यांकडून काम करविणे, आपल्याजवळ वस्तूंचा संग्रह असूनसुद्धा गरजूंना मदत न करणे इत्यादी गोष्टी अतिचाराच्या अंतर्गत येतात. या सर्व दोषांचा त्याग अहिंसाणुव्रतांच्या भावनेत आवश्यक आहे.

उपभोग-परिभोगपरिमाण व्रत व अनर्थदंड-विरमण व्रत ही दोन व्रते अहिंसेशी संबंधित आहेत. उपभोग-परिभोग व्रताचे पालन केल्यामुळे अहिंसा व्रताचे रक्षण होते. हे व्रत दोन विभागात सांगितले आहे. भोजन आणि व्यवसाय. रात्री भोजनाबद्दल भगवान महावीर म्हणतात 'संयमी आत्मा सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत भोजनाची इच्छा ठेवत नाही'. पुष्कळसे जीव-जंतु रात्री अजिबात दिसून येत नाहीत. रात्री जेवणात जंतू गेल्याने मांसाहार सेवनाचा दोष लागतो.

स्वामी समंतभद्रमहाराज म्हणतात, ज्या पदार्थांमुळे प्रमाद-आळस येतो, नशा-गुंगी येते असे पदार्थ अर्थात दारू, भांग, गुटखा, तंबाकू यांचा गृहस्थाने-श्रावकाने त्याग करावा. कांदा, बटाटा, लसूण, मुळा, आले, गाजर, रताळे इत्यादी कंदमूळात अनंतस्थावर जीवांची हिंसा होते अशा वस्तूंचा त्याग श्रावकाने करावा.

मांस, मदिरा, मध, पाच उदंबरफळे यात त्रस जीवांचा घात होतो. अशा वस्तूंचा त्याग श्रावकाने करावा. वात, पित्त, कफ वाढविण्याच्या पदार्थांचा त्याग श्रावकाने करावा. ताकामधून काढलेले लोणी ४८ मिनिटांच्या आत तापविले नाही तर त्यात असंख्य जीवांची निर्मिती होते. श्रावकाने त्याचा त्याग करावयास हवा. भाज्या धुणे, सडणे इत्यादी कामात दक्षता बाळगावी.

अनेक वस्तूंच्या प्राप्तीसाठी मनुष्य असंख्य व्यवसाय करतो. जंगल तोडणे, भट्ट्या पेटविणे, मोठ-मोठी यंत्रे चालविणे, मादक वस्तूंचा व्यापार, मासेमारी, कत्तलखाने चालविणे, झाडे तोडून त्यापासून कोळसा तयार करणे, हस्तिदंताचा व्यापार करणे, दारु विकणे, विष विकणे, जमीन ठोकून तयार करणे, तेलाचा घाणा, चुन्याची भट्टी, गुऱ्हाळ असे व्यवसाय न करता व्रतधारी विवेकी जैन गृहस्थाने सात्विक व्यवसाय करावेत.

अनर्थ-दंड-विरमणव्रताने अहिंसा व अपरिग्रहव्रताचे पोषण होते. स्वामी समंतभद्रमहाराज म्हणतात, आवश्यक हिंसा सोडून बाकी सर्वप्रकारच्या हिंसेपासून अलिप्त राहणे म्हणजे अनर्थ-दंड-विरमणव्रत होय. अकारण, निष्कारण, प्रयोजनरहित क्रियेस अनर्थ म्हणतात. कुऱ्हाड, तलवार, कट्यार, सुरी, कुदळ, फावडा, जमीन खोदण्याची साधने, मशाल, जळताटेंभा, दारु (बारुद), बॉम्ब, अणुबॉम्ब, धनुष्यबाण, तोफ, बंदूक, विष, विषारी पदार्थ, साखळदंड, दोर, तार हिंसा कारणार्थ दान देणे यास अनर्थदंड म्हणतात. श्रावकाने अशा विनाकारण घडणाऱ्या पापदायक क्रियांचा त्याग करावा.

या व्रतांचे पालन करणारा साधक कामवासनावर्धक वचनांचा, कामोत्तेजक हावभावांचा, असभ्य, अशिष्ट, अश्लिल शब्दांचा प्रयोग करीत नाही. हिंसात्मक शस्त्रांची निर्मिती, त्यांचा शोध, त्यांची विक्री इत्यादी गोष्टींपासून दूर राहतो. तो सतत जागृत, सतर्क, सावध राहतो.

आजच्या तरुण पिढीला जैनाचारसंहितेच्या अनर्थदंडव्रताच्या दोषांपासून दूर राहण्याचा सल्ला आजचे जैनाचार्य सतत देत असतात. जैन धर्माचीदान आणि दया ही दोन तत्त्वे समस्त मानवजातीची भूषण आहेत.

२१व्या शतकातील अद्वितीय पुण्यवैभव, शक्तिवैभव आणि गुणवैभवाचे स्वामी आचार्य महाश्रमणजीच्या दौऱ्यानिमित्त तेरापंथ समाज, पनवेलच्या वतीने पनवेलमध्ये स्वागत आणि मंगल प्रवचन सीकेटी महाविद्यालयात आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अर्चना परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आले होते. आचार्य महाश्रमणजी म्हणतात, ज्ञानप्राप्तीमध्ये अहंकार, क्रोध, प्रमाद, रोग, आळस हे मुख्य अडथळे आहेत. विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, अहिंसा, नीतिमत्ता, संयम या गुणांचा विकास होणे आवश्यक आहे.

गोयमलब्धी जैनसंघाच्या वतीने करंजाडे येथे गोयमलब्धि भक्तीभवनचा कार्यक्रम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाला.

क्रांतिकारी संत मुनिश्री तरुणसागर महाराज म्हणतात, भगवान महावीरांचा संदेश जगा आणि जगू द्या हे फक्त चार शब्द नाहीत, तर चार वेदसुद्धा आहेत, चार धामसुद्धा आहेत. ते म्हणतात, प्रत्येक घरातील मुलगा मर्यादा पुरुषोत्तम श्री रामचंद्र यांच्यासारखा बनावा आणि हाच माझा प्रयत्न आहे. या नियमांचे, कर्तव्याचे, व्रतांचे पालन करुन एखादा गृहस्थ स्वत:ला मुनिपदाच्या दृष्टीने पात्र बनवू शकतो.

**-प्रा. डॉ.व्ही.एन.रणदिवे,**
**पनवेल**

# गणितज्ज्ञ शकुंतला देवी

शकुंतला देवी यांचा आज स्मृतिदिन. शकुंतला देवी यांना ह्यूमन कॉम्प्युटर म्हणून ओळखले जाते. त्यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९२९ रोजी बंगलोरमध्ये झाला. त्यांचे कुटुंब म्हणजे पारपंरिक



कन्नड ब्राह्मण, पण शकुंतला देवी यांचे वडील नव्या युगातले. त्यांनी आपल्या भिक्षुकीच्या पारंपरिक व्यवसायाला आणि मंदिरातील परंपरागत पुजारी होण्याला नकार देऊन सर्कसमधील आडवाटेवरची नोकरी धरली.

शकुंतला देवींचे वडील सर्कसमध्ये काम करीत होते. शकुंतला तीन वर्षांच्या असताना त्यांना पत्त्यांचे खेळ शिकवताना त्यांच्या अफाट स्मरणशक्तीचे ज्ञान वडिलांना झाले. त्यांनाच शकुंतला देवी यांच्यामधील झपाट्याने गुणाकार-भागाकार करण्याच्या शक्तीची पहिल्यांदा ओळख पटली. सर्कस सोडून ते शकुंतला यांचेच रोडशो करू लागले. वयाच्या सहाव्या वर्षी शकुंतला यांनी म्हैसूर विद्यापीठात आपल्या अंकगणितीय कौशल्याचे प्रदर्शन केले.

शकुंतला देवी १९४४मध्ये लंडनला गेल्या. लंडनला गेल्यावर पुढे त्यांनी संपूर्ण जगामध्ये प्रवास केला आणि आपल्या बुद्धिमत्ता आणि गणितीय कौशल्याचे वेगवेगळे चमत्कार दाखवून त्यांनी संपूर्ण जगाला चक्रावून सोडले. १९७६मध्ये आपल्या अमेरिका दौऱ्यात त्यांनी संगणकापेक्षा अधिक वेगाने आकडेमोड पूर्ण करून त्याची उत्तरे परीक्षकांसमोर अचूक सादर केली.

१९७७मध्ये डलास विद्यापीठात शकुंतला यांचा मुकाबला तत्कालीन सर्वांत जलद कॉम्प्यूटर 'युनिव्हॅक'शी झाला. तेथे शकुंतला देवी यांनी एका २०१ अंकी संख्येचे २३वे मूळ ५० सेकंदात काढले व फळ्यावर लिहिले. हे मूळ काढायला कॉम्प्युटरला ६२ सेकंद लागले.

१८ जून १९८०मध्ये त्यांना ७६८६३६९७७४८७० आणि २४६५०९९७४५७७९ या दोन संख्या गुणाकारासाठी देण्यात आल्या. हे आकडे लंडनच्या इम्पीरियल कॉलेजच्या संगणक विभागाने निवडलेले होते. शकुंतला देवी यांनी या दोन आकड्यांचा अचूक गुणाकार करून दाखवत केवळ २८ सेकंदामध्ये १८९४७६६८१७७९९५४२६४६२७७३७३० हे उत्तर दिले. १३ आकडी दोन संख्यांचा गुणाकार त्यांनी फक्त २८ सेकंदात पूर्ण केला. त्यांच्या याच कामगिरीमुळे त्यांना ह्युमन कॉम्प्युटर म्हणून ओळखले जाऊ लागले आणि शकुंतला देवी यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये विराजमान झाले. शकुंतला देवी यांच्या अंगी एक अद्भूत प्रतिभा होती. अख्ख्या भारतास त्याची दखल घ्यावी लागली. गुगलने त्यांच्या पहिल्या जयंतीनिमित्त डुडल बनवून त्यांना आदरांजली वाहिली होती. भारतात परतल्यावर १९८८मध्ये त्यांना अमेरिकेतून बर्कलेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठामधील मानसशास्त्र विभागाचे विशेष आमंत्रण आले. या विभागातील प्रा. आर्थर जेनसन यांनी त्यांच्यावर संशोधन करण्यास सुरुवात केली. प्रा. आर्थर जेनसन यांनीदेखील त्यांच्यावर असंख्य प्रयोग केले. कोणत्याही अवघड बहुअंकी संख्येचे घनमूळ काढणे किंवा कोणत्याही बहुअंकी संख्येचा सातवा किवा आठवा घात काढायला सांगण्याची खोटी की, शकुंतला देवी यांचे उत्तर तयार असायचे. अशा या महान गणितज्ज्ञाचे २१ एप्रिल २०१३ रोजी निधन झाले. **(साभार इंटरनेट)**

# माणगावात वाहतूक कोंडी कायम

## बाजारपेठेत नागरिकांना फटका



**माणगाव : प्रतिनिधी**

शाळा विद्यालयाच्या परीक्षा आटोपल्या नंतर गावी जाण्याची लगबग सुरू झाली त्यातच लग्नसराई सुरू झाल्याने नागरिकांनी गावाकडे कूच केली आहे. त्यामुळे माणगाव बाजारपेठेत पुन्हा वाहतुकीची कोंडी झाली असून त्याचा फटका नागरिकांना बसला आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव बाजारपेठेत दोन्ही बाजूंनी वाहतूक कोंडी झाल्याने पर्यटक नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली असून माणगावात वाहतूक कोंडीची साडेसाती कायम राहिल्याचा प्रत्यय नागरिकांना आला आहे.

पुणे व पश्चिम महाराष्ट्रातून पर्यटक मोठ्या प्रमाणात पर्यटनासाठी रायगडात आले आहेत. दर शनिवार - रविवार व हॉलीडे आला की, माणगाव बाजारपेठेत प्रवासी नागरिकांना वाहतूक कोंडीशी सामना करावा लागला आहे. माणगावचे दोन्ही बाजूंनी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीशी सामना प्रवासी नागरिकांना करावा लागत आहे. वाहतूक कोंडी सोडविताना पोलिसांची चांगलीच दमछाक झाली आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने दरम्यानच्या काळात प्रवाशांचे पाण्यासाठी हाल झाले. त्यामुळे पर्यटक नागरिकांच्या उत्साहावर वाहतूक कोंडीचे पाणीच पडले. कोकण व तळ कोकणात जाणाऱ्या व येणाऱ्या नागरिकांना या वाहतूक कोंडीशी सामना करावा लागला. दर शनिवारी - रविवारी माणगाव व इंदापूर येथील मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावर वाहतूक कोंडी पाहायला मिळते. या दोन्ही बाजारपेठेला बायपास काढण्याचे काम गेले अनेक वर्षापासून सुरु असून ते काम रखडले असल्याने नागरिकांना याचा नाहक फटका बसत आहे. आज सकाळपासूनच मुंबई - गोवा महामार्गावर माणगाव, इंदापूर या शहरात वाहतूक कोंडी झाली आहे.

उन्हाळयाचे सुट्या असल्याने महामार्गांनी प्रवासी नागरिकांच्या वाहनांच्या रांगा लागल्यामुळे वाहतूक संत गतीने सुरु होती. मुंबई - गोवा महामार्गावर मुंबई बाजूकडून वाहनाच्या रांगा महामार्गावर दिसत होत्या. पुणे बाजूकडून समुद्र व पर्यटना स्थळावर मौज मजा करण्यासाठी आपल्या कुटुंब व मित्रासह ग्रुप वर्षा सहलीसाठी मोठ्या प्रमाणांत आले आहेत. त्यामुळे सर्वांनाच या वाहतुक कोंडीचा फटका बसला. मुंबई - गोवा महामार्गावरील इंदापूर, माणगाव येथील बायपासचे काम पूर्ण झाल्यास माणगावमध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमचा सुटेल. अशी आशा नागरिकांना वाटत असून हि वाहतूक सोडवण्यासाठी वाहतूक पोलीस तसेच महामार्ग पोलीस व माणगाव पोलीस विशेष प्रयत्न करीत आहेत.

# रेवदंड्यांत अवैध व्यवसाय वाढले

## मटका खुलेआम तर सर्रास गुटखा विक्रीसुध्दा बिनधास्त; महिलावर्गाची संप्तत प्रतिक्रिया

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत बेकायदेशीर मटका अगदीच खुलेआम सुरू आहेच, परंतु तर गुटखा विक्री सुध्दा बिनधास्त असल्याचे स्पष्ट चित्र आहे.

रेवदंडा व परिसरात बेकायदेशीर मटका सुरू असून भ्रमणध्वनीच्या माध्यमातून भर रस्त्यात मटका एजंट व्यवसाय साधून आडमार्गाला उभे राहून घेतलेल्या मटकाचे आकडे भ्रमणध्वनी व्दारेच मटका मालकांना पाठवित आहेत. एकदंरीत भ्रमणध्वनीने मटका व्यवसाय पुर्वी पेक्षा तेजीत आला असून खुलेआम रस्तात उभे राहून एजंट मटका व्यवसाय चालवीत आहेत. मटका खेळून झटपट श्रीमंत होण्याच्या नादाने अनेक युवावर्ग वाममार्गाला लागले असल्याचे चित्र आहे. महिना व दिवसभरातील आर्थिक उत्पनाचा भाग मटका खेळून घालवीत असल्याने महिलावर्ग संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. सदर मटका व्यवसाय पुर्णतः बंद करावेत, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

गुटखा विक्रीस पुर्णतः बंदी असताना सुध्दा रेवदंडा व परिसरात बेकायदेशीपणे गुटखा विक्री केली जात आहे. गुटखा आरोग्यास अत्यंत घातक असताना सुध्दा युवावर्ग तोंडात गुटखा ठेवीत पिचकार्या भर रस्त्यात फेकत असतात. ही गुटखा विक्री चोरीछुपके होत असून नेहमीच्या गिर्याइकांना गुटखा माल पुरविण्यात येतो. गुटखा खरेदी करून घरात अथवा परिसरात ठेवून त्यानंतर रस्तावर बेकादेशीरपणे विक्री केली जात आहे. गुटखाच्या मागणीसाठी गुटखा खाणारे गुटखा विक्रे त्याच्या घरी सुध्दा रात्रीचे समयी खरेदी करत असतात. आजूबाजूच्या सर्व शेजारी मंडळीना येथे गुटखा विक्री केली जाते, व खरेदीसाठी रात्रीचे ग्राहक येत असतात यांची पुर्ण माहिती असते, मात्र तरीही पोलिसांनी नजरेत हे गुटखा विक्री करणारे का येत नाहीत, असा सवाल केला जातोय.

रेवदंडा व परिसरात खुलेआम मटका तसेच सर्रास गुटखा विक्री बिनधास्त सुरू आहे, या बेकायदेशीर धंदयावर पोलिसांचा वचक केव्हा बसेल असा प्रश्न महिला गर्व उपस्थित करत आहेत.

# पेण तालुक्यात यात्रांना प्रारंभ

## ग्रामीण भागात जोरदार तयारी



**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील यात्रांना रामनवमीपासून सुरुवात झाली असून तालुक्यातील वाशी, वढाव, बोरी, कळवे, रावे दादर या गावांसह इतर गावांमध्ये यात्रांना प्रारंभ झाले असून व्यापाऱ्यांपासून ग्रामस्थांची लगबग पाहायला मिळत आहे. या यात्रांसाठी मोठी गर्दी उसळणार असून त्यातच लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी असल्याने पोलीस यंत्रणादेखील सज्ज झाली आहे. या यात्रांमधून दरवर्षी कोट्यवधींची उलाढाल होत असते.

एकीकडे सुरू झालेला चैत्र महिना व दुसरीकडे लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरू असतानाच गुढीपाडव्याच्या शुभमुहर्तानंतर रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये यात्रांचा हंगाम सुरू झाला आहे. महाराष्ट्रात मानाची समजली जाणारी आगरी-कोळी बांधवांची इष्टदेवता असणारी कार्ला येथील एकविरा देवीची यात्रा उत्सव होताच, त्यानंतर विविध ठिकाणच्या स्थानिक ग्रामदेवतांच्या यात्रांना सुरुवात होते. यंदाच्या यात्रांचे वैशिष्ट म्हणजे निवडणुकीच्या धामधूमीत २३ दिवस ग्राम तसेच देवतांच्या यात्रोत्सवाचा जल्लोष पहायला मिळणार आहे.

ऐन उन्हाळ्यात यात्राप्रेमींचा उत्साह शिगेला पोहचला आहे. ग्रामदेवतांच्या यात्रेत छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांची मोठी कमाई होत असल्याने व्यापारी वर्गात आनंदाचे वातावरण दिसून येत आहे. तालुक्यातील प्रती अयोध्या म्हणून ओळखली जाणारी बळवली गावातील प्रभू श्रीरामांचे मंदिर असलेल्या बळवली गावची यात्रा बुधवारी झाली. दादर येथील ग्रामदेवतांची यात्रा मोठी गुरुवारी झाली. वढाव येथील काळभैरव देवाची यात्रा रविवारी (दि.२१) आहे. तालुक्यातील सर्वातमोठी समजली जाणारी वाशी येथील वरसुबाय जगदंबा भवानी देवीची यात्रा सोमवारी (दि.२२) पासून सुरू होणार आहे. या यात्रेत आकाश पाळणे, मनोरंजनाचे खेळ तसेच मेवा-मिठाईची दुकाने यांनी संपूर्ण परिसर गजबजतो. या यात्रेमध्ये काठ्या उभारणे हे एक वैशिष्ट असते. याच दिवशी गडब येथे काळबादेवीची यात्राही भरते. या यात्रेला गडब, कारावी व कासू परिसरातील भाविकांसह मुंबई व ठाण्यात राहणारे हजारो भाविक हजर असतात.

बोरी येथील आक्कादेवीची, पांडापूर गावची यात्रा मंगळवारी (दि.२३) भरणार आहे, तर कळवे गावातील यात्रा हनुमान जयंतीच्या दिवशी सुरू होणार आहे. वरेडी येथील काळभैरव देवाची यात्रा २५ एप्रिलला आहे, तर कोलेटी येथील यात्रा २८ एप्रिल रोजी भरणार आहे. मे महिन्यात रावे गावच्या आई रायवादेवीची यात्रा ८ मे रोजी होणार आहे. भव्य काठ्या हे या यात्रेचे वैशिष्ट मानले जाते. त्यानंतर जिते गावची श्री सत्यनारायण देवाची यात्रा ही अक्षयतृतीयेच्या दिवशी म्हणजे १० मे रोजी भरणार आहे. ही तालुक्यातील शेवटची यात्रा असणार आहे. या यात्रेनंतर पेण तालुक्यातील यात्रोत्सवाची समाप्ती होते.

# खोपोली महोत्सवाचे उद्घाटन



**खोपोली : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ खोपोलीच्या माध्यमातून स्थानिक उद्योजकाना चालना देण्यासाठी खोपोली महोत्सवाचा भव्य उद्घाटन सोहळा अल्टा लॅबोरेटरीज लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर जयंत धोटे आणि गीता धोटे या उभयतांच्या हस्ते झाला.

लायन्स क्लब ऑफ खोपोली तर्फे प. पू. गगनगिरी महाराज आश्रम येथे किडनीच्या आजाराने त्रस्त रुग्णांसाठी डायलिसिस सेंटर, डोळे तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर तसेच इतर आजारांवर मोफत इलाज केला जातो त्याच सोबत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. ह्या सर्व उपक्रमांसाठी निधी उभारणीकरिता तसेच स्थानिक उद्योजकाना प्रोत्साहित करण्यासाठी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात विविध प्रकारची छोटी मोठी उद्योगांची ८० दालने असल्याचे खोपोली लाइन्स अध्यक्ष अतिक खोत यांनी सांगितले.

खोपोली महोत्सवाच्या भव्य उद्घाटनानंतर पहिल्याच दिवशी हजारो खोपोलीकरांनी आयोजनास भरभरून प्रतिसाद दिला. या आयोजनात विविध कर्मणुकीचे कार्यक्रम, फटाक्यांची आतिषबाजी आणि बक्षीसांची लयलूट करण्यात आली. खोपोली महोत्सवाच्या आयोजनात लायन्स क्लबचे अध्यक्ष अतीक खोत ह्यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम प्रमुख सचिन बोराना, अजय पिल्ले, निजमुद्दिन जळगावकर, दिपाली टेलर तसेच सर्व लायन्स क्लबचे सभासद अथक परिश्रम घेत आहेत.

# उकाड्यात वाढ

**अलिबाग :** राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाच्या सरी कोसळत असल्या तरी कडक ऊन आणि नंतर ढगाळ वातावरण यामुळे जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी उकाडा वाढला आहे.


**Shop For Rent**

MAIN Road Corner Shops - 500 + 500 ft Otla for **RENT**. Prime, Newbuild 16' height, touching Registration Office, Nr. D Mart, New Panvel.

**OWN - 9322399183**


# राष्ट्रीय कार्यासाठी मतदान करण्याचे आवाहन



**मुरूड : प्रतिनिधी**

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अलिबाग १९२ अलिबाग विधानसभा मतदारसंघ मुकेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मुरूड तहसीलदार रोहन शिंदे यांनी मुरूड तालुक्यातील आदीवासी वाढीवर व विविध ठिकाणी जाऊन मतदान आपला अधिकार सुदृढ लोकशाहीसाठी मतदान हा महत्त्वाचा घटक असुन नवमतदारांनी यांचे साक्षीदार व्हावे तसेच मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता राष्ट्रीय कार्य म्हणून मतदान करावे, असे आवाहन मुरूड तहसीलदार रोहन शिंदे यांनी केले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने उपक्रम राबविण्यात आला.

या वेळी तलाठी, मंडळ अधिकारी यांनी निवडणुकीचे महत्त्व, मतदानाची जबाबदारी, युवा मतदारांचे कर्तव्य, निवडणूक प्रक्रिया आदींबाबत आदिवासी महिला पुरुष व युवकांशी संवाद साधला मतदान वोटर गाईडचे वाटप मतदारांना मतदार माहिती या मध्ये मतदारांचे नाव, भाग क्रमांक, खोली क्रमांक आदी आवश्यक माहिती असते. तालुक्यातील आदीवासी वाढीवर मतदारांना वोटर गाईडचे वाटप केले. मतदान ही प्रत्येकांची जबाबदारी असुन येत्या ७ मे ला आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन यावेळी मुरूड तहसीलदार रोहन शिंदे यांनी केले. या वेळी ग्रामस्थांना मतदानाची शपथ दिल्यावर ग्रामस्थांनी या वेळी मतदान करणार असल्याचा निर्धार केला.

या वेळी निवडणूक नायब तहसीलदार शेखर खोत, अमृत चोगले, वरदा मयेकर, संदेश पाटील आदींसह तलाठी मंडळ अधिकारी या मोहिमेत सहभागी झाले होते.


**कागदपत्रे हरविले बाबत.**

मी सौ. रूपाली संभाजी शिंदे राहणार सदनिका क्र. ३०४, शिवसाई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., आसुडगाव, ता. पनवेल, जि. रायगड आमचे कडून प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी खांदेश्वर शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ०६११/२०२४ दि.१९/०४/२०२४ असा नोंद आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

गहाळा झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. सदनिका क्र.३०४, शिवसाई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., आसुडगाव, ता. पनवेल, जि. रायगड चे खरेदी खत नोंदणी कृत दस्त ऐवज क्र.९३४४/२०१९.

वरील प्रकारची कागदपत्रे कोणास सापडल्यास त्यांनी कृपया मोबाईल क्र. ९९८७३९३५९४ वर संपर्क साधावा ही विनंती.

**सही/-**
**सौ. रूपाली संभाजी शिंदे**


# स्वच्छ सुंदर शाळा अभियान स्पर्धेचे पारितोषिक वितरण



**कर्जत : प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात स्वच्छ सुंदर शाळा अभियान स्पर्धा आयोजित केली होती. त्याचा निकाल जाहीर झाल्यानंतर आज तालुक्यातील प्रथम तीन क्रमांकाचे बक्षीस वितरण व धनादेश वाटप कार्यक्रम पंचायत समिती कर्जत येथे झाला.

पंचायत समितीमध्ये झालेल्या पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षपदी गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे होते. तर प्रमुख मार्गदर्शक गट शिक्षण अधिकारी संतोष दौंड होते. प्रथम क्रमांक पटकावल्या काळभैरव शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र बोराडे यांनी आपल्या मनोगतात, आम्ही स्पर्धेत उतरण्यापूर्वी आम्ही बरेचशे उपक्रम आधी पासूनच करीत होतो. एका उपक्रमाला केवळ साडे तीनशे लाईक हवे होते. आमच्या त्या उपक्रमाला तब्बल दोन हजार सहाशे लाईक मिळाले. आम्हाला या स्पर्धेसाठी गट शिक्षण अधिकारी संतोष दौंड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. हे माझे एकट्याचे यश नसून आमच्या पूर्ण टीमचे यश आहे, असे स्पष्ट सांगितले. चंद्रकांत साबळे व संतोष दौंड यांनीही मार्गदर्शन केले.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमिन मिळकती आमचे अशिलांने प्रस्ताविक जमीन मालक श्रीकांत बाळकृष्ण उर्फ नारायण खुटले या जमीन मालकाकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे नांदगाव तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गावाचे नाव | स.नं./हि. नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| नांदगाव | ३२/६ | ०-०७-००<br>पो.ख. ०-००-५०<br>एकुण ०-०७-५० | ०.२० |
| नांदगाव | ५०/१ | ०-१०-००<br>पो.ख.०-०१-७५<br>एकुण ०-११-७५ | २.४ |
| नांदगाव | ३७/६/व | ०-०५-७० | १.४० |
| नांदगाव | २६/१ | ०-१३-००<br>पो.ख.०-०१-३०<br>एकुण ०-१४-३० | ३.१७ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पनवेल
दिनांक- २०/०४/२०२४

**सही/**
**ॲड. श्री. दिपक आर. शेळके**

पत्ता : डी ३/१ किनारा हौ.सो.टी बावन बंगलो ता. पनवेल, जि. रायगड. मो. नं. ९८२०७९५६०५.


# धाकटी पंढरी येथे नागरी सामाजिक विकास संस्थेचे उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**

सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या वर्षा मोरे यांच्या अध्यक्षतेखाली निर्माण झालेल्या नागरी सामाजिक विकास संस्थेचे उद्घाटन खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डा. पंकज पाटील यांच्या हस्ते झाले.

खालापूर तालुक्यातील श्री क्षेत्र धाकटी पंढरी येथे श्री विठ्ठल रखमाई मंदिरात नागरी सामाजिक विकास संस्थेचा उद्घाटन समारंभ तसेच मंदिर प्रशासनासाठी आवश्यक असलेल्या साहित्य आणि वस्तूंचे लोकार्पण करण्यात आले. या संस्थेच्या माध्यमातून भविष्यात समाजहित जोपासले जाईल अशा उपक्रमांचे आयोजन करावे असा आशावाद डॉ. पंकज पाटील यांनी व्यक्त केला. खोपोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत यांनी संस्थेस आगामी वाटचालीस शुभेच्छा देताना आपण देखील सर्वतोपरी प्रयत्न करण्यास तयार आहोत, असे आश्वासन दिले.

समाजकारणासोबत भारतीय लोकशाहीतले अत्यंत महत्त्वाचे समजले जाणारे नागरी कर्तव्य अर्थात मतदान करण्याचे आवाहन खोपोली नगरपालिका शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी जयश्री धायगुडे यांनी केले. धाकटी पंढरी देवस्थान समितीचे अध्यक्ष अनंता पाटील, उपाध्यक्ष जयवंत पाटील यांनी देखील संस्थेस शुभेच्छा दिल्या.

यावेळी ताराराणी ब्रिगेडच्या राष्ट्रीय अध्यक्षा वंदना मोरे, उपाध्यक्ष कविता खोपकर, मेघा मोरे किशोरी चेऊलकर, रिद्धी केणी आदींनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले.



# फेरीवाल्यांनी रस्ताच व्यापला

## नवी मुंबई शहरातील प्रकार

## महापालिकेकडे कारवाईची मागणी



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरात बेकायदा फेरीवाल्यांची संख्या सातत्याने वाढताना पाहायला मिळते. नवी मुंबईतील रेल्वेस्थानकाबाहेरील पदपथ फेरीवाल्यांनी व्यापून टाकल्याने नागरिकांनी चालायचे कोठून, असा प्रश्न निर्माण झाला असून आता फक्त पदपथ नव्हे तर या फेरीवाल्यांचा रस्त्यावर ठाण मांडून व्यवसाय केला जात असल्याने शहरातील बेकायदा फेरीवाल्यांनी व्यापलेले पदपथ रिकामे करावेत तर आता फक्त पदपथ नाही तर रस्त्यावरच ठाण मांडणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

कोरोनाच्या काळात आर्थिक संकटामुळे व्यवसाय बदल तसेच दुकानाबाहेरील बेकायदा फेरीवाल्यांची संख्या वाढली ती सातत्याने वाढतच असून आता या फेरीवाल्यांचे बस्तान चक्क रस्त्यावर येत असल्याचे चित्र आहे. फेरीवाल्यांकडून पालिका कर्मचारी तसेच सुरक्षारक्षक पथकातील व्यक्तींना मारहाणीच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. शहराच्या आठही विभागांत मोठ्या प्रमाणात बेकायदा फेरीवाल्यांनी बस्तान मांडल्याचे पाहायला मिळते. पालिकेचे फेरीवाला धोरण अद्याप पूर्णत्वास आले नसून शहरात परवानाधारक फेरीवाले कमी तर बेकायदा फेरीवाले अधिक असल्याचे दिसत आहे. बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, दिघा या विभागांत विशेषत: रेल्वेस्थानक परिसरात फेरीवाल्यांचा वावर अधिक आहे.

> **बेलापूर विभागात सातत्याने बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येते. पदपथाबरोबरच रस्त्यावरही बेकायदा व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येईल.**
>
> **-शशिकांत तांडेल, सहाय्यक आयुक्त, बेलापूर विभाग**

बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी पालिकेने विभाग कार्यालयाअंतर्गत कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. तसेच या पथकाबरोबर सुरक्षा रक्षकही नेमलेले असतात. त्यांच्या संरक्षणात बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई केली जाते, पण कारवाई करण्यासाठी पालिकेची गाडी येणार याची माहिती फेरीवाल्यांना अगोदरच मिळते. सामान्य नागरिकांनी विचारणा केली तर फेरीवाले दमदाटी करत असल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी फेरीवाले असतात.

# तुर्भे कॉलनीत पदपथावर कचरा

## अनधिकृत बांधकाम व्यवसायिकांवर नागरिकांकडून संताप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे कॉलनी येथे अनधिकृत बांधकाम व्यवसायिकांनी बांधकामाचे डेब्रिज रस्त्यालगतच्या पदपथांवर आणि मोकळ्या भूखंडावर टाकण्यात आले आहे. याप्रकरणी स्थानिक नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.



सीबीडी, नेरूळ, वाशी, तुर्भे, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली येथील सिडको कॉलनी आणि गावठाण परिसरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे चालू आहेत. येथील भूमाफियांनी तुर्भे गाव येथे ५०-५० तत्त्वावर सिडकोच्या मालकीचे तसेच जुन्या चाळीवर किंवा दोन-तीन घरांवर पाच ते सहा माळ्याच्या इमारती उभारण्याचे काम चालू आहे. तुर्भे कॉलनी येथेही मोठ्या प्रमाणामध्ये अनधिकृत बांधकामे चालू आहे. जुनी बांधकामे तोडून निघालेल्या डेब्रिजचे डोंगर कॉलनीतील रहिवाशांना चालावयाच्या पदपथावर तसेच गाड्या पार्क करण्यासाठीच्या मोकळ्या भूखंडावर निर्माण केले आहे. तसेच येथील काही बांधकाम व्यवसायिकांचे इतर ठिकाणीदेखील बांधकामे चालू असून तिकडील डेब्रिजही याच ठिकाणी आणून ठेवत आहेत. या प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक रहिवासी करत आहेत.

# गांजा विक्रीसाठी आलेला तरुण ताब्यात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी एचओसी कॉर्नर येथे गांजा या अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी एक व्यक्ती मोटरसायकलवर येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली होती. यावर गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमन व त्यांच्या पथकाने सापळा लावून किरण माणिक जाधव (वय २७, रा. मोहोपाडा रसायनी) यास ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे दोन किलो ३०० ग्रॅम एकूण २३००० रुपये किमतीचा गांजा हा अंमली पदार्थ व मोटरसायकल किंमत ४५०००रुपये असा एकूण ६८००० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला.



याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १००/२०२४ अमली पदार्थ विरोधी कायदा१९८५ ८(क) व २० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील अधिक तपास रसायनी पोलीस ठाणे यांच्याकडून सुरू आहे. याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमन, एएसआय राजेश पाटील, एचसी संदीप पाटील, राकेश म्हात्रे, सुधीर मोरे, यशवंत जेमसे यांनी गांजा विक्री करणाऱ्या तरुणाच्या मुसक्या आवळल्या.

# शिवनगरमधील तरुणाला शस्त्र बाळगल्याप्रकरणी अटक



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शिवनगर मोहोपाडा येथील तरुणाकडे पिस्तूल शस्त्र व राऊंड असल्याची गोपनीय बातमीदाराद्वारे खात्रीशीर बातमी सहाय्यक पोलिस निरीक्षक संदिप पोमन व त्यांच्या पथकाला मिळाली होती.शिवनगर पत्रा आळीत जवळच्या परिसरात राहणारा सौरभ मुकुंद विश्वास (वय २४ वर्ष) हा त्याच्यासोबत अवैधरित्या विनापरवाना देशी बनावटीचे पिस्टल शस्त्र सोबत बाळगत असल्याबाबत माहिती मिळाल्याने आर.आर.रोडवेज चे समोर मुंबई -पुणे जुना महामार्गांवर नाकाबंदी करत सापळा लावला.

या सापळ्यात सौरभ विश्वास सापडला. त्याच्याकडे एक देशी बनावटीचे पिस्टल व एक राऊंड असा एकूण २६००० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून पुढील कायदेशीर कार्यवाही व अधिक तपास सुरु आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप पोमन, एएसआय राजेश पाटील, एएसआय प्रसाद पाटील, एचसी संदीप पाटील, एचसी राकेश म्हात्रे, एचसी सुधीर मोरे, एचसी झेमसे यांनी केला आहे.

# सारमाई मातेचा पालखी सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

तुर्भे स्टोअर येथील सारमाई हे नवी मुंबईतील एक पुरातन व जागृत देवस्थान असून नवसाला पावणाऱ्या, हाकेला धावणाऱ्या या सारमाई मातेचा पालखी सोहळा शुक्रवारी (दि. १९) मोठ्या उत्साहात झाला.



सारमाई ही तुर्भे गावची ग्रामदेवता असून या ग्रामदेवतेची दरवर्षी चैत्र शुद्ध एकादशीला मोठ्या उत्साहात ढोल ताशाच्या गजरात, वाजत - गाजत पालखीची मिरवणूक काढण्याची परंपरा असून यावर्षीही सारमाई मातेचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात झाला. या पालखीच्या मिरवणूक सोहळ्यात तुर्भे गावातीलच नव्हे तर संपूर्ण नवी मुंबईतील सान - थोर मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. रामतनु माता युवा प्रतिष्ठान व तुर्भे ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने हा पालखी सोहळा भव्य दिव्य स्वरूपात साजरा होतो.

शनिवारी तुर्भे गावातील मरीआई, शितलादेवी, कापरी बाबा या देवतांच्या जत्रेनिमित्त दर्शनासाठी भाविकांनी सकाळपासूनच फार मोठ्या रांगा लावल्या होत्या. पाळणे, मिठाई, खेळणी, बांगड्या तसेच विविध वस्तूंची मोठ्या संख्येने लागलेली दुकाने लक्ष वेधत होती.

# नवी मुंबईत बालनाट्य शिबिर




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई बालरंगभूमी आणि संत शिरोमणी कलामंच नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ४ मे ते १५ मे २०२४ बालनाट्य अभिनय कार्यशाळेचे आयोजन विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी करण्यात आले आहे. हे शिबिर रोज सायंकाळी पाच ते सात या वेळेत होणार आहे.

आजकाल मुले टीव्ही मोबाईल या गोष्टींमध्ये जास्त रमत आहेत असे सर्वजण बोलतात पण त्यांना विचार करण्यासाठी नवनवीन संकल्पना सुचण्यासाठी प्रोत्साहन कोण देणार? हे कशातून मिळू शकते तर सजीव अनुभव देऊन हा अनुभव नाटकातून मिळतो बालनाट्य कार्यशाळाअसतात त्यातून मुले विचार करायला शिकतात कोणी गाणी म्हणतात कोणी गोष्टी सांगतात कोणी अभिनय करतात बालनाट्य कार्यशाळा हा एक वेगळा पर्याय त्यांच्यासमोर आहे. त्यासाठी गेल्या २७ वर्षापासून उन्हाळी, दिवाळी सुट्टीमध्ये ज्येष्ठ रंगकर्मी श्रीहरी पवळे सभासदांसाठी विनामूल्य नाट्यकलांचे प्रशिक्षण मुलांना देत आहेत ही परंपरा त्यांनी सुरू ठेवली आहे. बाल कलाकारांच्या सुप्त कलागुणांना योग्य संधी मिळावी आणि त्यातून चांगले कलाकार व नाट्यरसिक घडावेत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या उद्देशाने शिबिराचे आयोजन केले जाते, जे विद्यार्थी पूर्वी संस्थेचे सभासद झाले आहेत त्यांच्यासाठी ही कार्यशाळा मोफत आहे.

प्रवेश मर्यादित असल्यामुळे लवकरात लवकर बालकलाकारांनी या शिबिरामध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन श्रीहरी पवळे यांनी केले आहे.



**कळंबोली : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारार्थ पनवेल परिसरात भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते आणि पदाधिकारी उत्साहात प्रचार करीत आहेत. कळंबोलीमध्ये करण्यात आलेल्या प्रचारावेळी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# उन्हात थंडगार नीरा भागवतेय प्रवाशांची तहान

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या उन्हाचा पारा ४० अंशापर्यंत गेलेला आहे. त्यात महामार्गावरून जाताना मात्र उन्हासोबत तापलेल्या रस्त्याचे चटके बसत असल्याने नागरिक हैराण आहेत. सायन-पनवेल महामार्गावरून जाणाऱ्या अशा नागरिकांना सध्या सुमधूर नीरा तहान भागवत आहे. वाशीपासून ते पनवेलपर्यंत नीरा विक्रीचे स्टोल लागलेले दिसत असून नागरिक वाहने पार्क करून निराचा आस्वाद घेताना दिसत आहेत.

नारळाच्या पाण्यासोबत नीरा हे पेय देखील निसर्गाचा चमत्कार समजला जातो. ताड, माड, खजुरी, शिंदी या झाडांमधून पाझरणारा हा द्रव माणसाला पोषक आणि उपायकारक ठरत आहे. या द्रवालाच 'नीरा' असे संबोधले जाते. अनेकांना ही ताडी अथवा माडी म्हणजे नशा आणणारे पेय वाटते. त्यामुळे नव्याने पिणारे अनेकजण काहीसे संशयानेच हे पेय पिताना दिसतात, मात्र एकदा मधुर निरेचा घोट पोटात गेला की नाही म्हणणारा ग्राहक हक्काने दोन ग्लास जादा पितो इतके हे पेय लज्जतदार व शरीराला तजेला देणारे आहे. जिथे ताड, माड, खजुरी, शिंदी ही झाडे उपलब्ध आहेत, अशी गावं, तालुक्यांमध्ये तसच आसपासच्या मोठमोठ्या शहरांमध्ये नीरा




विकण्यासाठी केंद्रं उभारण्यात आली आहेत.कोकणात हे पेय जास्तप्रमाणा त आढळते.सर्वत्र शीतपेयं, सरबतं, लस्सी, ताक यांसारखे तहान भागवण्याचे अनेक पर्याय सहज उपलब्ध होऊ लागल्याने काळाच्या ओघात या केंद्रांची संख्या मात्र खूपच कमी होत गेली होती, मात्र सायन-पनवेल या महाराष्ट्रातील सर्वाधिक वर्दळीच्या महामार्गावर शासनाने नीरा विक्री करण्यास दिलेल्या मुभेमुळे या नीरा विक्रेत्यांना अच्छे दिन आलेले आहेत.

नीरा प्यायल्यावर तरतरी, तजेला वाटतो. निरेची पौष्टिकता तिच्यातील फॉस्फरस, लोह, साखर, जीवनसत्व 'क', 'ब १' 'ब २' आणि नायसिनवर अवलंबून असते. त्यात घालण्यात येणाऱ्या खाण्याच्या चुन्यामुळे शरिराला कॅल्शिअमदेखील मिळते.

अनेक अपायांवर व त्वचेच्या विकारांवर औषधी गुणधर्म असलेल्या निरेचा फायदा होतो. त्यामुळे नीरा हे पेय महागड्या कृत्रिम शितपेयांच्या तुलनेत आपल्या वैशिष्ठयपूर्ण चवीमुळे व स्वस्त किमतीमुळे तग धरून आहे.

नीरा ही सूर्योदयापूर्वी काढली जाते. कारण झाडाला बांधण्यात आलेल्या मडक्यामध्ये गोळा झालेल्या निरेवर सूर्यकिरण पडताच ती आंबण्याची क्रिया सुरू होते. या आंबण्याच्या प्रक्रियेदरम्यान ही मौल्यवान जीवनसत्त्व नष्ट होतात, शिवाय ती शरीराला अपयायकारही ठरतात.

### नीरेमधील पौष्टिक घटक

भारत हा एकमेव देश आहे की, जिथे नीरेचा पेय म्हणून उपयोग केला जातो. परंतु भारतातील बहुतांश खेडेगावांमध्ये आजही ताज्या नीरेपेक्षा तिला आंबवल्यावर तयार होणारी ताडी पिणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. नीरेमध्ये असणारे पौष्टिक घटक नैसर्गिक साखर, जीवनसत्त्व ताडीमध्ये नसतात. गोड चवीच्या ताज्या नीरेवर आंबवण्याची प्रक्रिया झाल्यावर तयार होणाऱ्या ताडीमध्ये आम्ल, अल्कोहोल नशा आणणारे घटक तयार होतात. नशेसाठी ही ताडी प्यायली जाते.

# ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेत अपूर्वा रानडेंचे गायन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे २९ वे संगीतपुष्प संपन्न झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात मुंबई येथील शास्त्रीय संगीत गायिका अपूर्वा रानडे यांनी गायन सेवा सादर केली. रानडे यांनी विदुषी शुभाताई जोशी यांच्याकडे संगीताचे शिक्षण घेतले आहे.

रानडे यांनी आपल्या संगीत सभेची सुरुवात 'मधुवंती' रागातील विलंबित एकतालात बांधलेला 'काहे मन करो' हा बडा ख्याल गाऊन केली. त्यानंतर त्यांनी कर्नाटकी रागातील एक द्रुत बंदिश सादर केली. या नंतर त्यांनी काफी रागातील 'कैसे बियाउ बैरी रैन' ही ठुमरी आणि मिश्र पहाडी रागातील दादरा तालातील ''कदरे ना जानी मोरी बालमवा'' ही बंदिश सादर केली. नंतर त्यांनी 'छंद मजला विठ्ठलाचा' आणि 'ध्यान लागले रामाचे' हे दोन अभंग सादर करून 'का धरिला परदेस' व 'हे सुरांनो चंद्र व्हा' ही नाट्यपदे सादर केली. 'रब तोहे भूले नहीं बने' या ठुमरीने सभेची सांगता केली.

अनिरुद्ध भिडे यानी संवादिनी व स्नेहलकुमार धामापुरकर यानी तबला तर गणेश घाणेकर यानी तालवाद्यसाथ केली. सुखदा मुळ्ये-घाणेकर यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. ही सभा यशस्वी करण्यासाठी आयोजक मंडळ व मठातील साधकानी मोलाचे योगदान दिले.

## निवडक

### मुरूडमध्ये लांडोरला जीवदान



**मुरूड** : वावडुंगी ग्रामपंचायत हद्दीतील सायगावजवळ लांडोर लंगडत रस्त्यावरून जाताना तरुण कामगारांच्या निर्दशनास आली. त्यांनी तत्काळ शिघ्रे माजी सरपंच संतोष पाटील यांना सांगितल्यानंतर संतोष पाटील यांनी वनपाल संतोष रेवणे यांना फोन करून कळविले. वनपाल विजय कोसंबे, सर्पमित्र संदिप घरत व वनमंजुर घटनास्थळी पोहचले. त्यांनी लांडोरची तपासणी करून वनविभाग गेस्ट हाऊसमध्ये आणण्यात आले. जखमी लांडोरवर पक्षुवैद्यकीय अधिकारी डॉ. विनायक पवार यांनी उपचार सुरू करण्यात आले आहे. त्यानंतर तिला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार आहे.

### प्राचार्य विवेक ढेपे यांना पुरस्कार




**माणगाव** : येथील विवा कॉलेजचे तथा सामाजिक कार्यकर्ते विवेक ढेपे यांना अविष्कार फाउंडेशन महाराष्ट्र राज्य रायगड जिल्हा शाखेतर्फे राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार २०२४ जाहीर झाला असल्याची माहिती संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष पत्रकार संजय पवार व जिल्हाध्यक्ष तथा निवड समितीचे सदस्य शंकर शिंदे यांनी दिली. या पुरस्काराचे वितरण १२ मे रोजी पन्हाळगड, कोल्हापूर येथे होणार आहे. विवेक ढेपे हे ज्ञानदानासारखे कार्य करून विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### दोशी वकील कॉलेजमध्ये पदवीदान

**माणगाव** : तालुका एज्युकेशन सोसायटी दोशी वकील आर्ट्स कॉलेज अँड जीसीयूबी सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, गोरेगावमध्ये मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष पदवीदान तसेच महाविद्यालयाच्या वार्षिक बक्षीस वितरण समारंभाचे बुधवारी (दि.२४) सकाळी ९ वा. आयोजन करण्यात आले आहे. या महाविद्यालयामधील विद्यार्थी सन २०२२-२३मध्ये उत्तीर्ण तृतीय वर्षाचे विद्यार्थी तसेच सर्व पालकांनी समारंभासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन महाविद्यालयाकडून करण्यात आले आहे.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे झाला सुसाट

## बोरघाटात वाहनांची वेग मर्यादा वाढविली



**खालापूर : प्रतिनिणी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटात शनिवार (दि.१९)पासून वेगमर्यादा वाढविण्यात आली आहे. त्यामुळे आता धिम्या गतीने होणारा प्रवास सुसाट होणार आहे. अप्पर पोलीस महासंचालक वाहतूक यांनी बोरघाट पायथा फुडमॉल ते खंडाळा बोगदा अमृतांजन पुलाच्या पुढे खंडाळा गाव अशा १७ किमी अंतरावर वाहनांची वेगमर्यादा ६० करण्यात आली आहे, तर समतल भागावर ही वेगमर्यादा १०० किमी करण्यात आली आहे.

जलद प्रवासाचा मार्ग म्हणून स्वतःची ओळख निर्माण केलेल्या मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर आता वाहनांसाठी वेगमर्यादा निश्‍चित करण्यात आली आहे. घाट क्षेत्रामध्ये ही मर्यादा वेगळी असून उर्वरित मार्गावर वेगळी असणार आहे. याबाबतची अधिसूचना अपर पोलीस महासंचालक वाहतूक महाराष्ट्र राज्य सुखविंदर सिंह यांनी शनिवारी प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे इथून पुढे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे वरून प्रवास करताना सर्व प्रकारच्या वाहन चालकांनी या वाहतूक वेगमर्यादेचे पालन करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई ही सीसीटीव्ही कॅमेरे यांच्या माध्यमातून होणार आहे. ९४ किमी अंतराच्या मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे वर सर्वत्र गॅन्टी उभारत त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण मार्ग हा सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेमध्ये आला आहे.

किमी क्रमांक ३५.५०० ते किमी ५२.०० हा भाग घाट क्षेत्र म्हणून ओळखला जातो. तर उर्वरित भाग हा समतल भाग म्हणून ओळखला जातो. ज्या प्रवासी वाहनांमधून चालकासह आठ प्रवासी वाहतूक करतात (एम ०१ श्रेणीतील वाहने) अशा वाहनांसाठी समतोल भागामध्ये तासी वेगमर्यादा १०० किमी घाट क्षेत्रामध्ये ६० किमी अशी करण्यात आली आहे. ज्या प्रवासी वाहनांमधून चालकासह नऊ व त्यापेक्षा अधिक प्रवासी वाहतूक केली जाते.

त्या वाहनांसाठी (एम ०२ व एम ०३ श्रेणीतील वाहने) समतल भागामध्ये ताशी वेग ८० किमी तर घाट क्षेत्रामध्ये ४० किमी अशी वेग मर्यादा ठेवण्यात आली आहे. ज्यांचा उपयोग माल व साहित्य वाहतुकीसाठी केला जातो (सर्व एन श्रेणीतील वाहने) यांच्यासाठी देखील समतल भागामध्ये वेगमर्यादा ताशी ८० किलोमीटर तर घाट क्षेत्रामध्ये ४० किलोमीटर निश्‍चित करण्यात आली आहे.

## ताम्हिणी घाटात आयशर टेम्पो उलटून अपघात

### एकाचा मृत्यू; दोघे जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव-पुणे रस्त्यावरून भरधाव वेगाने येणारा आयशर टेम्पो ताम्हिणी घाटात कोंडेथर गावच्या हद्दीत उलटून झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून दोघेजण जखमी झाले आहेत. हा अपघात शुक्रवारी (दि.१९) दुपारी १ वा.च्या सुमारास घडला. याबाबतची फिर्याद श्रीराम भायगुडे (वय ५६, रा. उंद्रे वस्ती, पुणे) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

फिर्यादी श्रीराम तात्याबा भायगुडे व महेश बाळू कांबळे ऊसतोड करून गुरुवारी सायंकाळी ५ वा. पुणे येथून माणगाव येथे येत असताना आरोपी चालक चंद्रकांत हनुमंत भोसले (वय ५१, रा. दरेकरवाडी, पुणे) याने आयशर टेम्पो (एमएच १२ आरएन २४९९) वेगाने चालविल्याने त्याचा गाडीवरील ताबा सुटून ब्रेक फेल झाला व गाडी घाटाच्या वळणावर उलटली. या अपघातात गाडीमध्ये टपावर बसलेला महेश बाळू कांबळे हा गंभीर जखमी होऊन त्याला औषधोपचारासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात आणले असता येथे त्याचा मृत्यू झाला, तर चालक चंद्रकांत हनुमंत भोसले व फिर्यादी श्रीराम तात्याबा भायगुडे हे दोघे जखमी होऊन गाडीचे नुकसान झाले.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## श्रीवर्धन समुद्रकिनारी शुकशुकाट

### तापमानवाढीचा पर्यटन व्यवसायावर परिणाम


**श्रीवर्धन : बातमीदार**

एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यात मोठ्या प्रमाणात तापमानात वाढ झाली आहे. गेल्या आठवडाभरापासून उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आल्याने सर्वत्र ३५-४० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होत आहे. त्यामुळे या उष्णतेमुळे पर्यटकांनीही श्रीवर्धनकडे पाठ फिरविली आहे. शाळांना सुट्ट्या असल्या तरीदेखील उष्ण वातावरणामुळे श्रीवर्धनमधील समुद्रकिनाऱ्यांवर शुकशुकाट पहायला मिळत आहे.

गेल्या काही वर्षांत श्रीवर्धनमधील समुद्रकिनारे पर्यटकांच्या पसंतीस येत आहेत. त्यामुळे प्रत्येक शनिवारी व रविवारी श्रीवर्धन पर्यटकांनी भरून जाते. शाळांना सुट्ट्या जाहीर झाल्यानंतर शनिवार, रविवार वगळता श्रीवर्धनमध्ये खूप मोठ्या प्रमाणात पर्यटक आलेले पहायला मिळायचे, परंतु गेल्या काही दिवसांपासून वातावरणात सातत्याने बदल होत असून उष्णतेच्या लाटेमुळे नागरिक हैराण झाले आहेत.

त्यामुळे अशा उष्ण वातावरणात नागरिक बाहेर जाणे टाळत आहेत. त्यामुळे शनिवार असूनसुद्धा श्रीवर्धन समुद्रकिनारी अक्षरशः शुकशुकाट असल्याचे दिसत होते.

वॉटर स्पोर्ट्स, घोडागाडी, सेंड बाईक, उंटवाले त्याचप्रमाणे खाद्यपदार्थांचे स्टॉल वालेदेखील नुसतेच बसून असल्याचे दिसत होते.



## हिरवळ महाविद्यालयात प्रिवेन्शन इज बेटर दॅन क्युयर विषयावर सेमिनार



**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (सीएसएटी)मधील महिला विकास कक्ष आणि आयक्यूएसी विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्रिवेन्शन इज बेटर दॅन क्युयर या विषयावर मंगळवारी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सेमिनारसाठी प्रमुख अतिथी म्हणून रायगड फार्मसी कॉलेजच्या सहाय्यक प्रा. माया देसाई, महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम, उपप्राचार्य राकेश वडवलकर, महिला विकास कक्ष प्रमुख प्रा. वर्षा निकम उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत आयक्यूएसी विभाग प्रमुख प्राध्यापिका ज्योती पुजारी यांच्या हस्ते झाले. यानंतर माया देसाई यांनी, त्यांच्या मार्गदर्शनात महिलांच्या आरोग्याशी संबंधित विविध सर्व समावेश माहिती विद्यार्थिनींना समजावून सांगितली. यामध्ये कोणत्याही आजाराची प्रतिबंधात्मक काळजी कशी घ्यावी यावर त्यांनी भर दिला.

त्यांनी मासिक पाळी, स्त्री प्रजनन प्रणाली, महिला स्वच्छता आणि आरोग्य, महत्त्वाची जीवनसत्त्वे आणि स्वतःची काळजी घेण्याच्या तंत्रांबद्दल विविध उदाहरणांनी समजावून सांगितली.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी या सेमिनारचे आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले. संचालिका सोनाली धारिया यांनी या चर्चासत्रासारख्या शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे महिला सक्षमीकरणासाठी हिरवळ महाविद्यालयाचे कौतुक केले.

मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी या सत्राबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि महिलांच्या आरोग्याच्या तातडीच्या समस्यांशी निगडीत त्याचे महत्त्व पटवून दिले.

## कावीळ आजाराने १३ वर्षीय मुलीचा मृत्यू

**नागोठणे, पेण** : पेण तालुक्यातील वढाव येथील पूर्वा प्रमोद म्हात्रे (वय १३) या मुलीचा नुकताच कावीळ या आजाराने मृत्यू झाला. पेण तालुक्यातील वाशी, खारेपाट भागात सध्या काविळीची साथ पसरली आहे. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सहा रुग्णांची नोंद झाली आहे, तसेच काही रुग्ण खासगी रुग्णालयात जातात. त्यामुळे नक्की रुगणाचा आकडा समजू शकला नाही. यामुळे ग्रामस्थांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नुकतेच दिव गावातील १० वर्षांच्या मुलाचे कावीळने मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असताना वढाव गावातील पूर्वा म्हात्रे या १३ वर्षांच्या मुलीचा कावीळमुळे मृत्यू झाला. पुर्वाला कावीळची लागण झाली आसल्याने तिला पेण येथून सात दिवसांपूर्वी मुंबई येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, परंतु उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

## पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याण मंडळाचा खासदार सुनील तटकरे यांना पाठिंबा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड समुद्रकिनारी ५५ टपरीधारक असून येणाऱ्या पर्यटकांना विविध सुविधा देण्याचे काम करीत असतात. या सर्वांनी मिळून पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याण मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळाने महायुतीचे रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना पाठिंबा असल्याचे जाहीर केले आहे.

ज्या वेळी वादळ झाले होते, त्या वेळी किनाऱ्यावरील सर्व स्टॉलचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. त्या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी नगर परिषदेकडून आकारले जाणारे वार्षिक भाडे माफ करण्याची शिफारस केली होती. त्यामुळे येथील टपरीधारकांना मोठा दिलासा मिळाला होता.

त्यामुळे खासदार सुनील तटकरे मुरूड दौऱ्यावर आले असताना पद्मदुर्ग व्यावसायिक संघटनेतील सर्व पदाधिकारी व सदस्य यांच्याकडून जाहीर पाठींब्याचे पत्र देण्यात आले. या वेळी पद्मदुर्ग व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष अरविंद गायकर, उपाध्यक्ष दिव्या सतविडकर, ज्योती मसाल, सचिव शैलेश वारेकर, दामोदर खरगावकर, कविता खरगावकर, देवेंद्र सतविडकर, गोपाळ शर्मा, जायला वर्मा आदी उपस्थित होते.

अध्यक्ष अरविंद गायकर यांनी, कोरोना व वादळी काळात तटकरे कुटुंब सर्वत्र धावत होते व शासनाच्या माध्यमातून सर्व घटकांना मदत केली. त्याचप्रमाणे टपरीधारकांनासुद्धा मोठी मदत केल्यामुळेच आम्ही त्यांचे काम करणार असून ते मोठ्या मताधिक्याने जिंकून येतील यासाठी प्रयत्न करणार आहोत, असे सांगितले.



## रेवदंडा आगरकोट किल्ल्यातील सातखणी बुरूज

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आगरकोट किल्ला पोतुर्गिजांच्या काळातील असून आगरकोट सभोवातलची समुद्र तटबंदी आणि डोमिनिकन चर्च, फ्रांसिस्कन चर्च, चौकोनी बुरूज आणि सातखणी बुरूज हे पर्यटकांच्या आकर्षणाचा विषय ठरला आहे.

आगरकोट किल्लाच्या वावव्येकडील बुरूजाजवळील लहान दरवाजाचा आग्येस ४५.७२ मीटरवर तटबंदीच्या पश्‍चिमेकडील भिंतींत पडलेल्या भगदाडासमोर १५३४च्या सुमारास बांधलेल्या फ्रांन्सिस्कन इमातीच्या मध्यभागी असलेल्या ६.०९ मीटर चौकोनी आकाराच्या सातखणी बुरूजाच्या भिंतीच्या सांगाडा पहावयास मिळतो. पुर्वी त्याची उंची २९.२६ मीटर इतकी नमूद केलेली असली तरी वरच्या बाजूने भिंती पडल्यामुळे उंची कमी झालेली आहे. बुरूजाच्या लगत भोवताली सर्व इमारती भिंती पूर्णपणे पडलेल्या असून आजूबाजूस अर्धवट भिंतीचे अवशेष दिसतात.

समुद्रमार्गे शत्रुंवर करडी नजर ठेवण्यासाठी हा सातखणी बुरूजाची बांधणी झाली असावी, असे म्हटले जाते. या सातखणी बुरूजाच्या वरील बाजूकडून दुरवर समुद्रकिनारी नजर जात असल्याने शत्रुच्या हालचालीवर नजर ठेवण्यास या सातखणी बुरूजाचा उपयोग केला जात असे.

सध्या रेवदंडा मोठे बंदर कडे जाणाऱ्या मुख्यः रस्त्यावरून सातखणी बुरूजाकडे जाण्यासाठी मार्ग आहे. या ठिकाणी पर्यटकांची नित्याची रेलचेल असते.



## माणगावमध्ये मतदान जनजागृती रॅली



**माणगाव : प्रतिनिधी**

येत्या ७ मे रोजी रायगड लोकसभा मतदार संघाची निवडणूक होत असून या निवडणुकीसंदर्भात जनजागृती म्हणून प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. याबाबतची जनजागृती म्हणून माणगाव नगरपंचायत व विवा कॉलेज यांच्यातर्फे मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन शुक्रवारी (दि. १९) करण्यात आले होते.

या वेळी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी, नायब तहसीलदार प्रभाळे, कर्मचारी अतुल जाधव, विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे, उपप्राचार्य योगेश रानभरे, प्रा. प्रतीक नागरगोजे, तसेच नगरपंचायतीचे सर्व कर्मचारी, सफाई कामगार, विद्यार्थी उपस्थित होते. सर्व नागरिकांनी मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन करण्यात आले.





पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ पनवेल परिसरात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते आणि पदाधिकारी उत्साहात प्रचार करीत आहेत. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, निता माळी, माजी नगरसेवक प्रदीप सावंत, डी. आर. भोईर, शिवसेनेचे पनवेल महाप्रमुख प्रथमेश सोमण, भाजपचे शहर सरचिटणीस अमित ओझे, संजय जैन, संजय भगत, केदार भगत, प्रीतम म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, चिन्मय समेळ, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, रोहित जगताप, आरपीआयचे किशोर गायकवाड, गौतम पाटेकर, भाजपचे प्रभाग अध्यक्ष पवन सोनी, सुनील खळदे, अंजली इनामदार, सपना पाटील, उपेंद्र मराठे, भरत जाधव, कोमल कोळी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.












पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली विचुंबे, खैरणे, घोट व तळोजा फेज १ येथे प्रचार केला. या वेळी माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, विश्वजित पाटील, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, भाजप विभाग अध्यक्ष किशोर सुरते, माजी सरपंच बळीराम पाटील, के. सी पाटील, अविनाश गायकवाड, आप्पा गायकवाड, भरत पाटील, उपसरपंच स्वाती पाटील, रत्नमाला पाबरीकर, मंदा जंगले, आनंद गोंधळी, शाम म्हात्रे, निलेश म्हात्रे, डी. के. भोईर, चेतन सुरते, अनिल भोईर, सुदीप पाटील, शिवसेना पनवेल जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, भाजप नेते प्रल्हाद केणी, निर्दोष केणी, नंदू म्हात्रे, संतोष पाटील, रमेश मढवी, सुरेश पोरजी, सतीश कदम, संदीप बंदेकर, बूथ अध्यक्ष दिलीप केणी, नितीन केणी, संतोष मढवी, पियुषी दास, शकुंतला लवटे, लालती देवी व मोठ्या संख्यने महिला सहभागी झाल्या होत्या.













ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।।
जेणे निगमवल्ली प्रगट केली।।


विठ्ठल रुख्मीणी तुम्ही
अखंड आणा ध्यानी।।

वर्ष १९ वे

वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।।१।।
ज्ञान होय अज्ञानासी । ऐसा वर त्या टीकेसी ।।२।।
ज्ञान होय मूढा । अति मूर्ख त्या दगडा ।।३।।
वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी ।।४।।


सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके
शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।


तुकाराम तुकाराम
नाम घेता कापे यम।।

माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित

वै ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (कोपर) यांच्या उपस्थितीत

# अखंड हरिनाम सप्ताह

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**

**देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.**

व्यासपीठ चालक - ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

### दै नं दि न का र्य क्र म

पहाटे ४.०० ते ६.०० वा. -काकडा
सकाळी ८.३० ते १२.०० वा. -ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. -प्रवचन

सायं. ६.०० ते ७.०० वा. -सामुदायिक हरिपाठ
रात्री ७.३० ते ९.३० वा. -किर्तन
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

| वार/दिनांक | प्रवचन (सायं. ४ ते ५) | किर्तन (रात्री ७.३० ते ९.३०) |
|---|---|---|
| रविवार (दि. २१/०४/२०२४) | ह.भ.प. दिपक महाराज (कुंडेगाव) | ह.भ.प. अनंत महाराज पांचाळ (खारकोपर)<br>सौजन्य: सौ. श्रद्धा रमेशशेठ ठाकूर (खारकोपर) |
| सोमवार (दि. २२/०४/२०२४) | ह.भ.प. रोशन महाराज (बेलपाडा) | ह.भ.प. बाळ श्री राम होजगे महाराज (राजगुरुनगर-पुणे)<br>स्व. प्रभावती बाळकृष्ण भगत व<br>ह.भ.प. स्व. वत्सला रमाकांत भगत यांच्या स्मरणार्थ<br>सौजन्य: ह.भ.प. रमाकांत काशिनाथ भगत (शेलघर) |
| मंगळवार (दि. २३/०४/२०२४) | ह.भ.प. गोपीनाथ महाराज (जासई) | ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे (गणेगाव, कर्जत)<br>कै. शिवाजी गजानन पाटील यांच्या स्मरणार्थ<br>सौजन्य : सौ. ललिता सुनील पाटील (खारकोपर) |
| बुधवार (दि. २४/०४/२०२४) | ह.भ.प. राजेंद्र महाराज गुरुजी (कुंडेगाव) | ह.भ.प. व्यंकटेश महाराज सोनवणे<br>(संगमेश्वर, जिल्हाध्यक्ष, वारकरी साहित्य परिषद अ.नगर)<br>कै. सविता शिवाजी देशमुख यांच्या स्मरणार्थ<br>सौजन्य: श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| गुरुवार (दि. २५/०४/२०२४) | ह.भ.प. कृष्णा महाराज ठाकूर (धुतुम) | सदगुरु कृपांकित ह.भ.प. श्री. जयेश महाराज भाग्यवंत (श्रीमलंगगड)<br>सौजन्य : श्री. सुधीर तुलशिदास ठाकूर (खारकोपर) |
| शुक्रवार (दि. २६/०४/२०२४) | ह.भ.प. धावजी बाबा महाराज (जासई) | ह.भ.प. दिपक महाराज देशमुख (विश्वस्त श्री आगस्ती देवस्थान ट्रस्ट, अकोले)<br>कै. शिवाजी रघुनाथ देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य: श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| शनिवार (दि. २७/०४/२०२४) | स. ८.३० वा. -ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन<br>सायं. ४ ते ५वा. - दिंडी सोहळा<br>व दिपोत्सव सोहळा | ह.भ.प. युवराज काका महाराज देशमुख (आळंदी देवाची)<br>कै. गिताबाई त्रिबंक देशमुख यांच्या स्मरणार्थ<br>सौजन्य: श्री विराज जयवंत देशमुख (गव्हाण) |

**काल्याचे किर्तन रविवारी दि. २८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते १२ वा.**
**भागवताचार्य ह.भ.प. प्रविणजी महाराज पवार (संभाजीनगर)**
**कै. महेश रघुनाथ घरत यांच्या स्मरणार्थ सौजन्य : श्री. सचिनशेठ रघुनाथ घरत (शेलघर)**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com